MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष चोविसावे/अंक ४/एप्रिल २०२३

## संपादकीय

### "वा 'राव', कमालच केली!"

एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात वर्तमानपत्रात एक बातमी आली. त्या बातमीचा मथळा होता, 'प्राध्यापक सी. आर. राव यांना संख्याशास्त्राचे आंतरराष्ट्रीय पारितोषिक'. अधिक स्पष्टीकरण देताना बातमीत असे सांगितले होते की, गणिताचे हे पारितोषिक नोबेल पारितोषिकाच्या तोडीचे असून पारितोषिक विजेते १०२ वर्षांचे आहेत. ही बातमी वाचून कुतूहल जागे झाले आणि मनात अनेक प्रश्न निर्माण झाले. हे पारितोषिक काय आहे? सी. आर. राव कोण आहेत? त्यांच्या कोणत्या कामगिरीसाठी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे? या शतक पूर्ण केलेल्या व्यक्तीच्या जीवनकार्यातून आपण काय शिकू शकतो? या प्रश्नांची उत्तरे शोधताना खूपच उपयुक्त माहिती मिळाली.

प्राध्यापक कल्यामपुडी राधाकृष्ण राव (Calyampudi Radhakrishna Rao) यांचा जन्म १० सप्टेंबर १९२० रोजी कर्नाटक राज्यातील हडगळी या गावी झाला. शालेय स्तरापासूनच त्यांना गणितात रुची होती. ते पाहून त्यांच्या वडिलांनी, तसेच त्यांच्या शिक्षकांनी त्यांना गणितात उच्च पदवी घेण्यास उत्तेजन दिले. त्यांचा सल्ला मानून त्यांनी वॉल्टेर येथील आंध्र विद्यापीठातून १९४१ मध्ये एम. ए. ही पदवी मिळवली. त्यानंतर ते कलकत्त्याला गेले. सैन्यात भरती होण्याची त्यांची इच्छा होती. पण त्यात त्यांना यश आले नाही. परंतु प्राध्यापक पी. सी. महालोबनीस यांनी कलकत्ता शहरात स्थापन केलेल्या भारतीय सांख्यिकी संस्थेत (Indian Statistical institute) शिकाऊ उमेदवार म्हणून त्यांना काम मिळाले. योगायोगाने या संस्थेत प्रवेश मिळाला असला तरी त्या संधीचे त्यांनी सोने केले. या संस्थेत काम करीत असताना त्यांनी कलकत्ता विद्यापीठाची गणितातील आणखी एक एम. ए. ही पदवी मिळवली. एकूण ४० वर्षे ते या संस्थेशी जुळलेले होते. या काळात त्यांनी अनेक पदांवर काम केले. प्राध्यापक महालोबनीस यांच्या मृत्यूनंतर सी. आर. राव हे आय.एस.आय. संस्थेचे संचालक झाले.

केंब्रिज शहरात मानवंश आणि पुरातत्त्व शास्त्र या विषयावरचे एक संग्रहालय (Museum of Anthropology and Archaeology) आहे. या संग्रहालयातील एका प्रकल्पावर काम करण्यासाठी त्यांना एका संख्याशास्त्रज्ञाची गरज

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

होती. महालोबनीस यानी विकसित केलेल्या पद्धतीचा या संशोधनात उपयोग करायचा होता. या क्षेत्रातील माहिती असलेला तरुण शास्त्रज्ञ म्हणून सी. आर. राव यांची निवड करण्यात आली. केंब्रिज विद्यापीठाच्या निमंत्रणावरून ते १९४६ मध्ये केंब्रिजला गेले. तेथील किंग्ज कॉलेजमध्ये त्या काळातले नावाजलेले संख्याशास्त्रज्ञ प्राध्यापक आर. ए. फिशर (R. A. Fisher) काम करीत होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करून जीवशास्त्रीय वर्गीकरणातील सांख्यिकीय समस्या (Statistical Problems of Biological Classifications) या विषयावर त्यांनी प्रबंध लिहून केंब्रिज विद्यापीठाला सादर केला. त्यांचा प्रबंध स्वीकारून केंब्रिज विद्यापीठाने १९४८ मध्ये त्यांना पीच. डी. ही मानाची पदवी बहाल केली. त्यानंतर लगेच ते भारतात परत आले आणि आपल्या मूळच्या संस्थेत रूजू झाले. परत आल्यावर त्यांनी संशोधनाचे कार्य अधिक जोमाने राबविले. त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना संशोधन करण्यासाठी मार्गदर्शन केले. त्यांचे विद्यार्थी देखील त्यांचा वारसा चांगल्या पद्धतीने चालवित आहेत. आय.एस.आय.चे संचालक पद प्राप्त झाल्यानंतर त्यांनी संस्थेला दिशा देण्याचा प्रयत्न केला. अनेक सरकारी समित्यांवर त्यांनी काम केले. आपले संशोधन सादर करण्यासाठी त्यांनी अनेक विदेश दौरे केले. तसेच काही विद्यापीठांच्या निमंत्रणांवरून अल्पकाळासाठी ते वेगवेगळ्या देशांत जाऊन राहिले. १९८० मध्ये ते आय.एस.आय. संस्थेतून निवृत्त झाले.

इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट मध्ये असताना त्यांनी संख्याशास्त्रात मोलाचे संशोधन केले. त्यांच्या कामाचे वैशिष्ट्य हे की, केवळ आकडेमोड करत राहण्याऐवजी सांख्यिकीचा प्रत्यक्ष व्यवहारात आणि संशोधनात कसा उपयोग करता येईल याकडे त्यांचा कटाक्ष असे. विविध ज्ञानशाखांमध्ये केलेल्या प्रयोगांतून खूप माहिती मिळते. या माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढले जातात. हे विश्लेषण कसे करावे याचा मार्ग सी. आर. राव यांनी दाखविला. त्यातून क्रेमर राव असमानता (Cramer Rao Inequality), राव ब्लॅकवेल सिद्धांत (Rao Blackwell Theorem) असे काही सिद्धांत उदयाला आले. एखाद्या घटकांवर नेमक्या कोणत्या बाबीचा प्रभाव पडतो हे शोधून काढण्यासाठी प्रचरण विश्लेषण (Analysis of Variance) ही पद्धत वापरतात. या पद्धतीला थोडक्यात 'ॲनोवा' (ANOVA) असे म्हणतात. या विश्लेषण पद्धतीत राव सरांनी बहुमोल असे कार्य केले. राव यांच्या संशोधनामुळे संशोधनाची अनेक क्षेत्रे खुली झाली. त्यामुळे संख्याशास्त्रात सी. आर. राव हे नाव जगभर प्रसिद्ध झाले. त्यांनी संख्याशास्त्रात प्रसिद्ध केलेले लेख एकत्र करून केंब्रिज विद्यापीठाने त्यांना डी. एससी. ही आणखी एक उच्च पदवी बहाल केली. त्यांचे कार्य मूळातून समजून घेणे आवश्यक आहे. विशेषत: गणिताचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी राव सरांनी सांगितलेल्या सांख्यिकीय तत्त्वांचा अभ्यास करावा असे मी सुचवू इच्छितो.

वयाच्या साठाव्या वर्षी आय.एस.आय. या संस्थेतून निवृत्त झाल्यानंतर ते अमेरिकेला गेले. तिथेदेखील त्यांनी आपले अध्ययन आणि संशोधनाचे कार्य सुरूच ठेवले. वयाची ८५ वर्षे होईपर्यंत ते अध्यापनाचे काम करीत होते. त्यानंतर त्यांनी पूर्णपणे संशोधनाला आणि लेखनाला वाहून घेतले. त्यांनी डझनाहून जास्त पुस्तके लिहिली आहेत. शेकडो संशोधनपर लेख त्यांनी आंतरराष्ट्रीय संशोधन

(पृष्ठ क्र. ३ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रसारक मंडळ स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

**वर्ष चोविसावे/अंक ४/एप्रिल २०२३**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २७ वे/अंक १० वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**


**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | भारतातून चीनला गेलेले बौद्धधर्मप्रसारक (भाग - १) | श्री. जयंत कुलकर्णी | ३ |
| ३) | अथर्ववेदाचे मूर्धन्य विद्वान श्री श्रीधरशास्त्री अडी | वेदान्तरत्न प्रमोदशास्त्री कुलकर्णी श्री. कृष्णशास्त्री पळसकर | ८ |
| ४) | प्रवरेचा परिसर | श्री. नरेंद्र गोळे | ९ |
| ५) | ड्रॅगनच्या एकाधिकारशाहीला तडे | डॉ. शैलेंद्र देवळाणकर | १३ |
| ६) | विज्ञान प्रसाराची मूलतत्त्वे | श्री. अ.पां. देशपांडे | १६ |
| ७) | नौदलाच्या नव्या ध्वजाचे संकेत | चन्द्रशेखर टिळक | २१ |
| ८) | स्त्रियांचे मूलभूत अधिकार : न्यायिक सक्रियता | प्रा. विनोद एच वाघ | २३ |
| ९) | अवचिता परिमळू । झुळकला आळूमाळू | डॉ. आनंद कुलकर्णी | २७ |
| १०) | फ्रीडम फ्रॅक्चर कोण करतो आहे... | प्रमोद वसंत बापट | २८ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३० |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# ईश्वर



**विद्या प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष कै. डॉ. वासुदेव नारायण बेडेकर यांच्या पवित्र स्मृतीस नम्र अभिवादन !**

झिजले चंदन ज्ञान मंदिरी – योगी श्रीमंत
हाती जयाच्या संजीवन अन् – हृदयी भगवंत

कर्तृत्वाच्या पदोपदी तव खुलल्या पाऊल खुणा
तिमिर हटाया तेज कारणे – ये रे प्रेषिता पुन्हा

खूप तुडवली कर्तव्यास्तव – पथावर काटे
तव संगाने नित जोडले – जीवनातील फाटे

लिन होऊनी नम्रपणाने – जोडलेत हात
बंद लोचनी तुज मोक्षाया – हे ईशा प्रणीपात

जनसेवेची मनात होती – अभंग एक निष्ठा
या वेदीवर हे वासुदेवा – तूच एक द्रष्टा

तुज कार्याने पुरे भारले – हे जग नश्वर
मला वाटते तुझ्या रूपाने – अवतरला होता ईश्वर.

**श्री. अविनाश पवार**
सहाय्यक प्राध्यापक
महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

# भारतातून चीनला गेलेले बौद्धधर्मप्रसारक

(भाग - १)

*ज्येष्ठ अभ्यासक जयंत कुलकर्णी यांनी, 'भारतातून चीनला गेलेले धर्मप्रसारक' या विषयावर लेखमाला लिहिली आहे. त्याचा पहिला लेख खास दिशाच्या वाचकांसाठी - संपादक*



फो-बुद्धाचे चिनीभाषेतील नाव व चिनीलिपीतील त्याचे चिन्ह.

गौतमबुद्ध किंवा तथागत याच्या काळात जे राजे होऊन गेले त्यांची बुद्धाच्या धर्मप्रसारात बरीच मदत झाली. किंबहुना या राजांमुळेच बुद्धधर्माने भारताच्या सीमा ओलांडल्या व जवळजवळ तो जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला. उदा. सम्राट अजातशत्रू हा महावीर व बुद्धाच्या समकालीन होता व त्याने जैन व बौद्धधर्म या दोन्ही धर्मांना राजाश्रय दिला. नुसता राजाश्रय दिला एवढेच नाही, तर या धर्मांचा थोडाफार आक्रमकपणे प्रसारही केला. यानेच बुद्धाच्या मृत्युनंतर पहिली धर्मपरिषद भरविली. पण मिशनरी वृत्तीने धर्मप्रसार करण्याची सुरवात झाली सम्राट अशोकाच्या काळात. त्याने खोदलेल्या असंख्य शिलालेखांतून हे कार्य कशा प्रकारे चालत असे याची आपल्याला कल्पना येऊ शकते. यातील सगळेच शिलालेख वाचले गेले आहेत व त्यांचे मराठीत, इंग्रजीमधे केलेली भाषांतरे उपलब्ध आहेत. ती जरुर वाचावीत कारण हे शिलालेख वाचण्यासारखेच आहेत. हे शिलालेख सम्राट अशोकाच्या राज्यातच नव्हे तर त्याच्या राज्याबाहेर व काही श्रीलंकेतही सापडतात. सम्राट अशोकाने हे धर्मप्रसारक सिरिया, इजिप्त, मॅसिडोनिया इ. देशांमधून पाठविले व त्यांनी तेथे धर्मप्रसाराचे काम उत्तम प्रकारे पार पाडले. त्या काळात त्या देशात अँटिऑक थिऑस, टॉलेमी, मॅगॉस, गोनटस व अलेक्सझांडरसारखे राजे राज्य करीत होते. थोडक्यात भारतीय उपखंडातून हे धर्मप्रसारक एशिया, आफ्रिका व युरोप खंडात धर्मप्रसारासाठी प्रवास करीत होते हे आपल्या लक्षात येते.

बुद्धाच्या मृत्युनंतर जवळजवळ ३५०/४०० वर्षांनी अजुन एका राजाने बौद्धधर्माच्या प्रसाराला हातभार लावला आणि तो म्हणजे कुशाणांचा राजा कनिष्क.



**कुषाणांचे साम्राज्य**

असे म्हणतात, 'बुद्धाने त्याच्या हयातीतच कनिष्क पेशावरला एक भव्य स्तूप बांधेल' असे भविष्य वर्तविले होते. मध्य एशियामधून जी यु-ची जमात भारतात स्थलांतरीत झाली त्यांचा हा राजा. त्यांच्या स्थलांतरा-बद्दल परत केव्हातरी लिहीन. कारण तोही विषय बराच मोठा आहे. याच्याच राज्यातून भारतातून पहिला धर्मप्रसारक चीनमधे गेला व त्याबरोबर बौद्धधर्म.



**कुषाणांची नाणी..**

अर्थात याबाबतीत मतमतांतरे आहेत. काही इतिहासकारांचे म्हणणे आहे की, चीनला बौद्धधर्माबद्दल

कळले ते त्यांच्या कनिष्काच्या राजदरबारात असलेल्या त्यांच्या राजदुताकडून. ते काहीही असले तरी चीनमधून येथे आलेले बौद्ध भिख्खू व येथून गेलेले बौद्ध धर्मप्रसारक यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे बौद्धग्रंथ मूळस्वरूपात आजही उपलब्ध आहेत. चीनचा एक सेनापती कौ-वेन-पिंग-चाऊ याच्या एका पुस्तकात अशी नोंद आढळते - सम्राट मिंग-टी याने त्साई-इन व इतर तेरा जणांवर एक वेगळीआगळी कामगिरी सोपवली जी आजवर जगात कुठल्याच राजाने आपल्या सैनिकांवर सोपवली नव्हती. त्यांना भारतात जाऊन बौद्धधर्माचे पवित्र ग्रंथ चीन मधे घेऊन यायचे होते. या उल्लेखामुळे चिनी इतिहासकरांच्या मते बौद्धधर्म हा हान घराण्याचा सम्राट मिंग-टी (लिऊ-झुआंग) सम्राटाच्या काळात चीनमधे प्रथम आला. काळ होता २५-७५ साल. पण सगळं सोडून त्याने ही कामगिरी या तेराजणांवर का सोपवली असेल हा खरा प्रश्न आहे. त्यासाठी चीनमधे एक दंतकथा सांगितली जाते.

''त्याच्या राज्यकारभाराच्या चवथ्या वर्षी सम्राट मिंग-टीच्या स्वप्नात एक अवतारी पुरुष आला ज्याचे शरीर झगझगत्या सोन्याचे होते. त्याच्या मस्तकामागे प्रभावळ चमकत होती. या आकृतीने त्याच्या महालात प्रवेश केला व ती नाहिशी झाली.'' त्या काळातील प्रथेप्रमाणे त्याने त्याच्या मंत्र्यांना या स्वप्नाचा अर्थ विचारला. त्यातील एक मंत्री, फौ-ई, जो त्याच्या दरबारात राजज्योतिषी होता, त्याने सांगितले, - 'महाराज आपण भारतात जन्मलेल्या एक महान साक्षात्कारी पुरुषाबद्दल ऐकले असेल. त्याचे नाव आहे शाक्यमुनी बुद्ध. आपल्या स्वप्नाचे मूळ त्या थोर पुरुषाच्या शिकवणीत दडलेले आहे.''

हे ऐकल्यावर त्याने ताबडतोब त्याच्या दरबारातील अठराजणांची भारतात जाऊन ते पवित्र ग्रंथ चीनमधे आणण्यासाठी नियुक्ती केली. दंतकथा काहीही असो, त्याचा मतितार्थ एवढाच की, चिनी सम्राटाच्या कानावर बुद्धाच्या शिकवणीबाबतीत बरीच माहीती पडली असणार. इतकी की त्याला त्याची स्वप्नेही पडू लागली होती. ही मंडळी अकरा वर्षांनंतर चीनला परत आली व त्यांनी येताना ग्रंथ तर आणलेच, पण असे म्हणतात की, त्यांनी राजा उदयन याने काढून घेतलेली बुद्धाची अनेक चित्रेही बरोबर आणली. बुद्धाने त्याच्या काळात राजा उदयनाच्या दरबाराला अनेकवेळा भेटी दिल्या होत्या कदाचित त्या काळात ही चित्रे काढली असावीत. (किंवा त्या चित्राच्या नकला असाव्यात. ही चित्रे जर चीनमधे मिळाली तर बुद्ध दिसायला कसा होता यावर बराच प्रकाश पडेल किंवा पडलाही असेल. मला कल्पना नाही.) बौद्धग्रंथ एकोत्तर आगम ज्याचे फक्त चिनी भाषांतर उपलब्ध आहे त्यात राजा उदयन याने बुद्धाची प्रतिमा चंदनाच्या लाकडात कोरून घेतली असा उल्लेख सापडतो. या मंडळींनी त्यांच्याबरोबर दोन पंडितही चीनला नेले. एक होता काश्यप मातंग नावाचा बौद्ध पंडित. त्याला सम्राटाने काही प्रश्न विचारले. (मध्यभारतातील हा एक ब्राह्मण होता व त्याने बौद्धधर्म स्वीकारून त्याचा पूर्ण अभ्यास केला होता. याच्या बरोबर अजुन एक पंडित होता त्याचे नाव होते गोभर्ण. या दोघांबद्दल आपण नंतर वाचणार आहोत.) असो. पहिला प्रश्न होता, ''धर्मदेवाने या देशात अवतार का घेतला नाही? हे सांगू शकाल का आपण ?''

''या विश्वाच्या मध्यभागी का-पि-लो नावाचा देश आहे. तीन युगांच्या बुद्धांनी येथेच जन्म घेतला. सर्व देवांची आणि ड्रॅगनची येथेच जन्म घेण्याची मनिषा असते. या प्रदेशात जन्म घेऊन बुद्धधर्माचे पालन करावे व सत्याचे खरे स्वरूप समजावे ही एकच इच्छा घेऊन ते येथे जन्म घेतात. बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा प्रकाश सर्वदूर पसरला आहे. हा धम्म शिकविण्यासाठी हजारो भिख्खू या विश्वात संचार करीत असतात.''

यावर विश्वास ठेवून सम्राटानी ताबडतोब एक मठ

बांधण्याचा आदेश दिला. काश्यप मातंग व त्यांच्या बरोबर असणाऱ्या मंडळींनी हे सर्व बौद्ध साहित्य एका पांढऱ्याशुभ्र घोड्यावर लादून आणले म्हणून राजाने त्या मठाला नाव दिले 'श्वेताश्व मठ'.

श्वेताश्व मठ बराचसा जसा होता तसा ठेवला आहे.




**श्वेताश्व मठ**

भारतात गेलेले चिनी व त्यांच्याबरोबर परत आलेले पंडित यांचे नाव तर इतिहासात अजरामर झालेच, पण ज्या घोड्यावर हे ग्रंथ लादून आणण्यात आले त्याच्या योगदानाचा विसर पडू नये म्हणून त्याचे नाव या मठाला देण्याची कल्पना मला तरी भारी वाटते. या मठात पुजेसाठी त्यांनी एका बुद्धाच्या मूर्तीची स्थापना केली. वेशीवरही त्यांनी एक बुद्धाची प्रतिमा सामान्यजनांच्या दर्शनासाठी ठेवली, जेणेकरून सर्वांना या थोर माणसाचे सतत स्मरण होत राहील. हीच कहाणी आपल्याला अनेक चिनी ग्रंथात आढळते. जवळजवळ तेरा ग्रंथांत. (श्री बील यांचे पुस्तक).

पण या लेखाचे प्रयोजन हा इतिहास सांगणे हे नसून, जे धर्मप्रसारक भारतातून इतर देशांत, विशेषत: चीनमधे गेले त्यांची आठवण करून देणे आहे. मधे एका लेखात मी या अशा थोर धर्मप्रसारकांबद्दल एक लेखमालिका लिहून त्यांच्या चरणी अर्पण करण्याची इच्छा प्रदर्शित केली होती, ती वेळ आता आली आहे असे मला वाटते. मी या धर्मप्रसारकांबद्दल जेवढा विचार करतो, तेवढेच माझे मन त्यांच्याबद्दल अपार आदराने भरून जाते. आपल्या भूमीपासून दूर, अवघड प्रवास करत, संकटांवर मात करीत हे धर्मप्रसारक दूरवर बुद्धाचा धर्म शिकवीत राहिले त्याबद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे कमीच आहेत. मध्य एशिया, अफगाणिस्तान या प्रदेशांबद्दल माझ्या मनात एक सुप्त आकर्षण आहे ते तेथे नंतर प्रस्थापित झालेल्या इस्लाम धर्मामुळे नव्हे; तर अत्यंत चिकाटीने, अहिंसक मार्गाने भारतीय बौद्धांनी केलेल्या बौद्धधर्मप्रसारामुळे.

हा जो पंडित काश्यप मातंग होता हा चीनमधे गेलेला पहिला धर्मप्रसारक मानला जातो.

काश्यप मातंग. (किआ-येह मो-थान) कंसात दिलेले हे त्याचे त्या काळातील प्रचलीत चिनी नाव आहे. हा काश्यप गोत्रात जन्मला म्हणून याचे नाव काश्यप मातंग असावे.

पंडित काश्यप मातंग. हा हिंदू ब्राह्मण मगध देशात जन्मला, पण त्याचे कार्यक्षेत्र होते पेशावर किंवा पुरुषपूर. काश्यप मातंगांना चीनला नेण्यात आले तो काळ साधारणत: सन ६७ ते ७५ असा असावा. हल्ली काही सापडलेल्या चिनी कागदपत्रांवरून/किंवा लेखांवरून काही इतिहासकार असे मानतात की, चीनमधे बौद्धधर्म पोहोचला तो ख्रिस्तपूर्व १ या काळात. अर्थात त्याच्याही आधी म्हणजे ख्रिस्तपूर्व १२० या काळात बौद्धधर्माविषयी चीनमधे माहिती होती हे निश्चित. ते कसे ते या लेखाचा विसय नाही. आपण मात्र असे म्हणू की असे असले तरी तरी काश्यप मातंगाच्या काळात चीनमधे धर्माचे खरे आगमन झाले.

काश्यप मातंग आणि गोभर्ण यांना पहिली अडचण आली ती भाषेची. त्यांना खोतानपर्यंत संस्कृतची साथ होती. संस्कृत समजणारी बरीच मंडळी त्याकाळात तेथे होती. चीनच्या सिमेवर बोलल्या जाणाऱ्या खोतानी भाषेचाही त्यांनी बराच अभ्यास केला होता. पण चीनमधे आल्यावर हे सगळे कोलमडले. सम्राटाने बांधलेल्या मठात जेव्हा चिनी बौद्धांनी या दोन धर्मगुरुंना बुद्धाची

शिकवण सांगण्याचा आग्रह धरला तेव्हा त्यांची मोठी पंचाईत झाली. त्यांनी चिनी भाषेचा अभ्यास मोठ्या चिकाटीने चालू केला, पण त्यांना लगेचच उपयोगात आणता येईल असा एखादा ग्रंथ रचण्याशिवात गत्यंतर नव्हते. त्यांनी ज्यांच्याबरोबर ते आले होते त्या चिनी सरदारांच्या मदतीने चिनी जनतेसाठी किंवा अभ्यासकांसाठी एक सूत्र लिहिले. याचे नाव होते ''बुद्धाने सांगितलेली बेचाळीस वचने.'' काश्यप मातंगाने हे करण्यात खूपच दूरदृष्टी दाखविली असे म्हणायला पाहिजे. बऱ्याच वेळा कशाला, बहुतेक वेळा ज्ञानी पंडीतांना काय सांगू आणि किती सांगू असे होऊन जाते. पण काश्यप मातंगांनी तो मोह आवरला व चिनी अभ्यासकांच्या पचनी पडेल अशा साध्यासुध्या, सहजतेने समजेल, अशा ग्रंथाची रचना केली. हा ग्रंथ अजुनही टिबेटमधे व मोंगोलियामधे त्या त्या भाषेमधे उपलब्ध आहे. हाच संस्कृत भाषेतील चिनी भाषेत भाषांतरीत झालेला पहिला ग्रंथ असे काही जणांचे म्हणणे आहे पण ते चुकीचे आहे. हा ग्रंथ चिनी भाषेतच रचला गेला. त्यात थेरवदा व महायान पंथाच्या सुत्रांचे भाषांतर आहे हे खरे.

त्या काळात चीनमधे ताओ व कन्फुशियस तत्त्वज्ञानाचे प्राबल्य होते. सम्राटाच्या दरबारात अर्थात त्यांचेही धर्मगुरू होतेच. या मंडळींनी काश्यप मातंगाच्या कार्यात अडथळे आणण्याचा भरपूर प्रयत्न केला; पण शेवटी एका वादविवादात हरल्यावर सम्राटानेच बौद्ध धर्म स्वीकारल्यावर त्यांचे प्राबल्य बरेच कमी झाले व बौद्धधर्माची पताका चीनमधे फडकू लागली. एवढ्या कमी काळात हे यश आश्चर्यजनकच म्हणायला हवे. अर्थात त्याच्यामागेही बरीच कारणे होती.

एकतर बुद्धाचा धर्म सुटसुटीत, कशाचेही अवडंबर न माजविणारा होता. शिवाय ताओंचे तत्त्वज्ञान सामान्यजनांस कळणे अत्यंत अवघड होते.

शेवटी सगळ्यात महत्त्वाचे कारण होते ते म्हणजे खुद्द सम्राटानेच दिलेला राजाश्रय.

काश्यप मातंग यांनी आपला देश सोडून चीनमधे बौद्धधर्माच्या प्रसारास वाहून घेतले. ते परत कधीच भारतात परत आले नाहीत. लो-यांग येथे पो-मा-स्सूच्या मठात त्यांनी अखेरचा श्वास घेतला तेव्हा त्यांचे वय बरेच असावे.

त्याच मठात त्यांचे एक चित्र रंगविलेले आहे. त्यावरून आपल्याला ते कसे असावेत याची कल्पना येऊ शकते.




**काश्यप मातंग**

त्यांनी केलेल्या अडतिसाव्या सुत्राचे मराठी भाषांतर येथे देत आहे.

३८ वे सूत्र - जिवनाची क्षणभंगुरता.

बुद्धाने एका श्रमणास विचारले, -

किती काळ तू जिवंत राहणार आहेस याची तुला कल्पना आहे का ?

''अजुन काही दिवस तरी !'' श्रमणाने स्मितहास्य करीत उत्तर दिले.

''तुला जिवनाबद्दल काही माहिती आहे असे मला वाटत नाही.'' बुद्ध म्हणाला.

त्याने तेथेच असलेल्या दुसऱ्या श्रमणास हाच प्रश्न केला.

''हे जेवण संपेतोपर्यंत तरी !'' त्याने उत्तर दिले.

''तुलाही जिवनाबद्दल काही माहिति आहे असे वाटत नाही.''

मग त्याने तिसऱ्या श्रमणास हाच प्रश्न केला.

''या एकाच श्वासापर्यंत.'' त्याने उत्तर दिले.

''बरोबर ! तुला जिवनाचा खरा अर्थ समजला आहे असे मी म्हणू शकतो''

बुद्धाने स्मितहास्य करीत उत्तर दिले.....

काश्यप मातंगांनंतरही त्यांनी सुरू केलेले हे कार्य त्यांच्या शिष्यांनी मोठ्या धडाडीने सुरू ठेवले. एवढेच नव्हे तर, भाषांतरीत ग्रंथात अधिकाधीक अनमोल ग्रंथांची भर पडत गेली...

त्यातीलच एक श्रमण होता ''धर्मरक्ष''. त्याचे चिनी भाषेतील नाव आहे ''चाऊ फा-लान''...

दोन हजार वर्षे टिकून राहिलेल्या या मठाचा पाडाव केला १९६६ मधे थोर पुढारी माओत्से तुंग यांच्या अनुयायांनी. श्वेताश्व मठाच्या लुटीचे वर्णन कम्युनिस्ट पार्टीच्या एका सदस्याने असे केले आहे -

या मठाजवळील कम्युनिस्ट पार्टीच्या शाखेने सांस्कृतिक क्रांतीच्या नावाखाली शेतकऱ्यांची एक टोळी घेऊन हा मठ उद्ध्वस्त करण्यासाठी त्यावर चाल केली. १००० वर्षापूर्वी (अंदाजे ९१६ साली) लिओ घराण्याने तयार करून त्या मठात ठेवलेले अठरा अरहतांचे पुतळे प्रथम फोडण्यात आले. दोन हजार वर्षांपूर्वी भारतीय भिख्खूंनी आणलेले ग्रंथ जाळण्यात आले. जेडचा श्वेत अश्वाचा अनमोल पुतळा तोडण्यात आला. आज ज्या काही वस्तू त्या मठात दिसतात त्याची कहाणी वेगळीच आहे.

कंबोडियाच्या राजाने, नरोद्दम सिंहनुक याने या मठाला भेट देण्याची इच्छा प्रदर्शित केल्यावर चौ-एन्लायची गडबड उडाली. कारण नरोद्दम सिंहनुकची भेट ही सदिच्छा भेट होती आणि तो जगाला चीनमधे सगळे कसे व्यवस्थित चालले आहे हे सांगणार होता. त्याच्या भेटीआधी चीनमधील इतर मठांतील बऱ्याच वस्तू रातोरात त्या मठात हलविण्यात आल्या. व नंतर कम्युनिस्ट पक्षाच्या आदेशानुसार त्या देणगी म्हणून स्वीकारण्यात आल्या ज्यामुळे त्या वस्तू परत पाठविण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही.

महायानातील महापरिनिर्वाण सुत्रामधे शाक्यमुनींनी असे भविष्य वर्तविले होते की, त्याच्या निर्वाणानंतर सैतान, राक्षस व वाईट प्रवृत्ती बौद्धधर्माचा नाश करण्यासाठी बौद्धधर्मामधे महंत, भिख्खूं म्हणून जन्म घेतील व धर्माचा नाश करतील. हे खरे आहे की, दंतकथा यावर मी भाष्य करणार नाही, पण जे घडले ते तसेच झाले. राजकारणी भिख्खूंनी कम्युनिस्ट पक्षाला हाताशी धरून (किंवा उलटे) बौद्ध संघाचे नियम बदलले. आता त्यांना निळे कपडे घालण्याची परवानगी देण्यात आली. दारू पिण्यास व मांसभक्षण करण्यासही परवानगी देण्यात आली. विवाह करण्यास उत्तेजन देण्यात आले तर संपत्ती जमा करण्यात काहीही वाईट नाही असे सांगण्यात आले. ज्यांनी याला विरोध केला त्यांना निर्घृणपणे ठार मारण्यात आले. हे अर्थातच सगळे सांस्कृतिक क्रांतीच्या नावाखाली चालले होते. या प्रकारे त्यांनी तिन्ही धर्म नष्ट करण्याच प्रयत्न केला.

लेनिन याने म्हटल्याप्रमाणे - ''धर्माचे अस्तित्व मिटविण्यासाठी धर्मातूनच प्रयत्न व्हायला पाहिजे.'' तसे प्रयत्न नेटाने करण्यात आले. पण काय झाले हे आज आपण पहातोच आहोत... तिन्हीही धर्म/तत्त्वज्ञान आज जिवंत आहेत व त्यांच्या अनुयायांमधील धर्मावरील श्रद्धाही चांगल्या बळकट झालेल्या दिसतात. असो.

**- जयंत कुलकर्णी**
ज्येष्ठ अभ्यासक,
पुणे

प्रत्येक घरात मनुष्य जन्माला येतो, पण 'माणुसकीच' कुठेतरी जन्म घेते.


# अथर्ववेदाचे मूर्धन्य विद्वान श्री श्रीधरशास्त्री अडी

*चैत्र शुद्ध प्रतिपदा दि २२ मार्च रोजी २०२३ रोजी अथर्ववेदाचे मूर्धन्य विद्वान श्री श्रीधरशास्त्री अडी यांचे देहावसान झाले. त्यांच्या कार्याचा आढावा घेणारा लेख - संपादक*

**ब्रह्मध्वज घेऊन ब्रह्मलोकी प्रयाण**

आज सकाळीच गोकर्ण येथील अथर्ववेदाचे मूर्धन्य विद्वान श्री श्रीधरशास्त्री अडी यांनी शेवटचा श्वास घेतला. जवळपास ७४/७५ वर्षांच त्यांचं आयुष्य आणि अथर्ववेदाचा चालता बोलता कोश संपला.

श्री. पू. अडी गुरुजी हे गोकर्ण येथील आत्मलिंगाचे पुजारी घराण्यात जन्म घेतलेले. त्यांनी मात्र पुजारीपणा न स्वीकारता ब्राह्मणाचे आद्य कर्तव्य अध्ययन व अध्यापन हेच जीविकेसाठी स्वीकारले. ऋग्वेदाचे क्रमांत सभाष्य अध्ययन करून नंतर अथर्ववेदाचे अध्ययन काशी येथे पंचोली गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली केले. ते वैदिक होते तसेच पंडितही होते. संपूर्ण अथर्ववेदाचे सायणभाष्य त्यांच्या जिव्हेवर विराजमान होते. निरुक्त आणि सायणभाष्य हे त्यांचे जिव्हाळ्याचे विषय. अथर्ववेदाचे ते केवळ पढीत पंडित नव्हते तर प्रयोगशील साधक होते हे सिद्धही होते. ते अथर्ववेदाच्या कौशिकगृह्यसूत्रात सांगितलेल्या मंत्रानुष्ठानाचे यशस्वी साधक होते. त्यांनी केलेल्या अनुष्ठानाने अनेक आर्तांचे दुःख दूर झालेले प्रत्यक्ष कित्येकांनी पाहिले आहे. ते अवलीया पण होते. त्यामुळे त्यांचे वागणे सामान्य माणसाला बुचकळ्यात टाकणारे होते. ते संस्कृतचे उत्कृष्ट कवी होते. दरवर्षी शिवरात्रीला एक नवीन संस्कृत श्लोक रचून ते तो गोकर्ण महाबळेश्वराला अर्पण करत असत. समस्यापूर्ती रचना करण्यात त्यांना विशेष रुची होती. शृंगेरी जगद्गुरू श्री श्री अभिनवविद्यातीर्थस्वामी आणि श्री श्री भारतीतीर्थस्वामी आणि आत्ताचे विद्यमान स्वामी श्री श्री विधुशेखरभारती स्वामी या सर्वांचे आशीर्वाद त्यांना लाभले होते. काशी येथे शृंगेरी मठात राहूनच त्यांनी अथर्ववेदाचे अध्ययन केलेले आहे. अनेक उत्तम पंडितांच्या सहवसात त्यांची विचारसरणी पक्की झाली होती. वेदान्ताचे अतीशय नांवाजलेले पंडित श्रीदेवस्वरूप मिश्र यांचा सहवास त्यांना दीर्घकाळ लाभला होता. गोकर्ण येथे श्रीमेधादक्षिणामूर्ती संस्कृत महाविद्यालयात त्यांनी भारतभरातील विद्यार्थ्यांना अथर्ववेदाचे अध्यापन केले. महाराष्ट्रावर तर त्यांचे विशेष उपकार आहेत. कारण त्यांनी शिकवलेलेच श्री दिनकर जोशी व श्री देशिकशास्त्री कस्तुरे या दोघांपासूनच अथर्ववेदाची परंपरा महाराष्ट्रात सुरू झाली. प.पू. गुरुवर्य महामहोपाध्याय यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे गुरुजींच्या प्रेरणेने हे दोन विद्यार्थी शिकले आणि आज आचार्य झाले.



श्री अडी गुरुजींच्या जाण्याने अथर्व वेदातील रहस्यवेत्ता हरवला आहे. त्यांना जशी रहस्य माहीत होती तशी आत्ता कोणाला माहिति असणार हा प्रश्नच आहे.

(पृष्ठ क्र. १२ वर)

# प्रवरेचा परिसर

*प्रवरा नदीच्या उगमापासून तर गोदावरी संगमापर्यंत घेतलेला प्रवरा प्रवाहाचा वेध – संपादक*

प्रवरा नदीचे खोरे हे महाराष्ट्रातील सर्वाधिक उंचीवर वसलेले, सर्वाधिक जलसमृद्ध पाणलोटक्षेत्र आहे. प्रवरेवरील भंडारदरा धरण समुद्रसपाटीपासून सुमारे ७५० मीटर उंचीवर आहे. त्याच्या सर्व बाजूंनी उंचच उंच पर्वतशिखरे आहेत. महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर कळसूबाई (१,६४६ मीटर), अलंगगड (१,४०० मीटर), कुलंगगड (१,४७० मीटर), मदनगड (१,४९४ मीटर), रतनगड (१,२९७ मीटर) यांनी वेढलेल्या खोऱ्यात प्रवरा नदी उगम पावते. या क्षेत्रात सरासरी वार्षिक पाऊसमान ३,२२० मिलिमीटर आहे. या प्रचंड पावसामुळे ते पावसाळ्यात नेहमीच भरभरून वाहत असते.

प्रवरा नदीचा उगम रतनगडावर रत्नादेवीच्या गुहेत होतो असे मानले जाते. सांधण दरीतून साम्रद गावाकडे बाहेर पडताना, पाठीमागे दिसणाऱ्या डोंगर रांगेतील उजवीकडे सुस्पष्ट रूपरेषेचा किल्ला रतनगड आहे. रतनगडाच्या उजवीकडे म्हणजे उत्तर बाजुला असलेला सुळका रतनगडाचा खुटा म्हणून ओळखला जातो. रतनवाडीतील अमृतेश्वराच्या मंदिरातून प्रवरा नदी उगम पावते असाही एक समज आहे.




अमृतेश्वर मंदिर हेमाडपंती स्थापत्यशैलीचे पुरातन मंदिर आहे. हे अवश्य पाहावे असे मंदिर रतनवाडी गावात आहे १. हे गाव अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात आहे. मंदिराच्या आवाराबाहेरच पुष्करणी नावाने ओळखली जाणारी बारव असून तिचे स्थापत्य चौरस आहे. तीन दिशांनी उतरण्याकरता पायऱ्या आहेत. भोवतीच्या भिंतीत सालंकृत अशी बारा देवकोष्टकांची रचना केलेली. त्यांच्यावर पुन्हा छोट्या कोरीव शिखरांची रचना आहे. या कोष्टकांमध्ये गणेशाची एक मूर्ती सोडल्यास, उर्वरित सर्व ठिकाणी विष्णूचे अवतार आहेत. जसे की शेषशायी, माधव आणि इतर. त्यामुळे स्थानिक लोक या पुष्करणीला विष्णूतीर्थ म्हणतात.







अमृतेश्वर मंदिर हे इसवीसनाच्या बाराव्या वा तेराव्या शतकात बांधलेले आहे. लांबी ६१ मीटर असून रुंदी ३६ मीटर आहे. अमृतेश्वर मंदिराच्या पश्चिम द्वारावर

कलात्मक मिथुनशिल्पे कोरलेली आहेत. शिखराच्या कमानींत दोन्हीही बाजूंना घडवलेली नाजूक नेढी विहंगम सौंदर्य वाढवतात. शिखराच्या मध्यावरील देवळीचे भौमितिक सौंदर्य तर लपतच नाही. स्थापत्य योजनेत मंडप, अंतराळ आणि गर्भगृह हे मंदिराच्या पश्चिम दिशेस आहेत. तसेच पूर्व दिशेस दरवाजासमोर द्वारमंडपही आहे. पश्चिममुखी असलेले हे मंदिर शिवाला समर्पित आहे. मंदिराच्या गर्भगृहातील शिवलिंग जून ते ऑक्टोबर हे ४ महिने पाण्यात असते. नंतर हळूहळू पाण्याची पातळी कमी होते. मंदिरातील स्थापित शिवलिंग विलक्षण आहे. खडकाच्या पोकळीत योनी स्थापित केलेली आहे. त्यावर कलशाच्या आकारात तीन दगड एकमेकांवर ठेवलेले आहेत. मंदिराच्या पूर्वेकडील म्हणजेच मागील दरवाजाकडे तोंड करून पूर्वेला नंदी स्थापित आहे. मंडपात सच्छिद्र खिडक्या आहेत. मंदिरावरील शिखर सुस्थितीत असून अत्यंत सुशोभित आहे. मूळ छताचा भंगलेला भाग नंतरच्या काळात वीरगळ, इतर दगड आणि स्थापत्यकलेतील घटकांनी भरलेला दिसून येतो. शिखराला चार उभी टोके आहेत. ज्यात लघुशिखर असून सपाट आमलकाने आच्छादित आहेत. हे मंदिर सिन्नर येथील गोंदेश्वर मंदिरासारखेच असून स्थापत्याच्या दृष्टीने भूमिज प्रकारात मोडते. भिंती भौमितिक आकृत्यांनी सुशोभित केलेल्या आहेत. चौकोनी पायांवर स्थापित स्तंभ सुबक कोरलेले आहेत. त्यावर अष्टकोनी घटक असून त्यावर कीचकहस्त आहेत २. मंडपाचे छत





घुमटाकार असून त्यावर ठरावीक अंतर सोडून नर्तक व वादकांच्या तिरप्या प्रतिमा आहेत. मंदिराचे शिखर भूमिज प्रकारचे असून शिखरावर चारही बाजूंनी एक एक अशा चार वेली आहेत. या मंदिराला ४ मार्च १९०९ रोजी राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

मंदिराच्या उत्तर आणि दक्षिणेच्या बाजूंना मंदिराच्या सभामंडपास सुमारे मीटरभर उंचीच्या, एकसंध दगडात भौमितिक फुल्या कोरलेल्या खिडक्या आहेत. एका खिडकीतून आत पाहिले तर सभामंडपापलीकडील खिडकीतील फुल्यांतून बाहेरचा प्रकाशही दिसू शकतो एवढ्या त्या एकरेषीय आहेत. जुळवून घेतलेल्या आहेत. एकसारख्या आहेत. या चित्रात डावीकडे खिडकीची बाहेरील बाजू दिसत आहे तर उजवीकडील भागात आतील बाजू दिसत आहे.

प्रवरा ही नदी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यात अकोले तालुक्यातील रतनगडापाशी उगम पावून, जिल्ह्यात सुमारे २०८ किलोमीटर लांबीचा प्रवास करते. पुढे त्याच जिल्ह्यात प्रवरासंगम गावी ती गोदावरीला जाऊन मिळते. तिला स्वतःलाही मुळा, आढळा, म्हाळुंगी या उपनद्या आहेत. प्रवरा नदीच्या किनाऱ्यावर अकोले, संगमनेर, कोल्हार, नेवासा ही प्रमुख गावे आहेत. तिच्यावर अकोले येथे भंडारदरा हे मोठे धरण आहे.




भंडारदरा जागेचा, धरणाच्या दृष्टीने शोध १९०३

मध्ये केला गेला. भंडारदरा हे त्याकाळी भारतातील सर्वात उंच धरण म्हणून ओळखले जात असे. धरणाचे बांधकाम १९१० साली सुरू होऊन, धरणाचे लोकार्पण १९२६ साली झाले. धरणाची उंची ५०७ मीटर आहे तर, रुंदी तळाशी ८२.२९ मीटर आहे. त्यामुळे १५.५४ वर्ग कि.मी. क्षेत्रफळाचा पाणीसाठा निर्माण झाला आणि ५७,००० हेक्टर क्षेत्रफळ ओलिताखाली आले. येथील महत्तम विद्युत उत्पादन क्षमता १० मेगावॅट आहे. धरणाचे पाणी नदीपात्रात सोडले असता ते एके ठिकाणी खडकावरून खळखळ वाहत नदीपात्रात झेपावते. त्यावेळी ते दृश्य एखाद्या भव्य छत्रीसारखे दिसते, म्हणून या धबधब्याला 'छत्रीचा धबधबा' (अंब्रेला फॉल) असे म्हणतात ३. छत्रीच्या आकाराचे पाणी नदीपात्रात झेपावते तेव्हा पर्यटक भान हरपून ते दृश्य पाहत असतात. धबधब्यातून उडणारे असंख्य तुषार पर्यटकांना चिंब भिजवून टाकतात. पावसाळ्यात अतिरिक्त पाणी जेव्हा सोडले जाते तेव्हा ते पाणी प्रचंड वेगाने वाहत जाते. ते दृश्य नक्कीच अनेक वर्ष डोळ्यांसमोर तरळत राहते. धरणाच्या भिंतीलगतच एक मोठी बाग तयार करण्यात आलेली आहे. येथून 'छत्रीच्या धबधब्या'चा आनंद घेता येतो. तसेच धरणाच्या सर्व मोऱ्यांमधून सोडले जाणारे पाणी पाहताना वेळ कसा भर्रकन निघून जातो ते कळतच नाही. धरणाच्या पाणीसाठ्यात वर्षभर बोटिंगची सेवा उपलब्ध आहे. धरणाच्या भव्य व अथांग पाण्यातून नौकानयन करण्याचा आनंद काही औरच असतो. भंडारदरा धरणाच्या पूर्वेला, अकोले शहराच्या रस्त्यावर सुमारे १० किलोमीटर अंतरावर, प्रवरा नदीला ५० मीटर उंचावरून उडी घ्यावी लागते. या ठिकाणाला रंधा धबधबा म्हणून ओळखले जाते. पुढे प्रवरेचे पाणी, संगमनेर, वाघापूर, जोर्वे असा प्रवास केल्यावर ओझर येथेही निळवंडे धरणात अडविले जाते. या धरणातून निघणाऱ्या डाव्या व उजव्या कालव्यातून अनुक्रमे संगमनेर व श्रीरामपूर तालुक्यांतील शेतीला पाणी दिले जाते. तेथील लोकांची जीवनदायी असलेल्या प्रवरा नदीला अमृतवाहिनी असेही म्हटले जाते. धरणाला अप्पर प्रवरा धरण म्हणूनही ओळखतात.




भंडारदरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात होणाऱ्या प्रचंड पावसामुळे ते पावसाळ्यात नेहमीच भरून वाहत असे. साठवणासाठी आरक्षित सुयोग्य अशा धरणाअभावी पाण्याचा खूपच अपव्यय होत असे. म्हणून या धरणाची योजना करण्यात आली. १९९९ साली त्याचे बांधकाम सुरू झाले. विविध कारणांनी झालेल्या लोकविरोधामुळे आणि विलंबांमुळे धरणाचे काम केवळ २०११ सालीच पूर्ण होऊ शकले. धरणाची उंची ७३.९१ मीटर असून धरणाच्या भिंतीची लांबी ५८३ मीटर आहे. धरणापाठीमागे रतनगडचा खुटा स्पष्ट दिसत आहे. रतनगडाच्या पायथ्याशी साम्रद गावानजीक असलेल्या 'सांधणदरी' मुळे हल्ली पदभ्रामकांत हा परिसर अत्यंत लोकप्रिय होत आहे. पर्यटनाचे दृष्टीने झपाट्याने विकसित





झरा खोल असला की पाणी शांतपणे वाहते.

होत आहे. 'सांधणदरी' म्हणजे अरुंद (काही फूट ते दहा-वीस मीटर), लांबलचक (काही किलोमीटर), उंचच उंच (उदाहरणार्थ १,६०० फूट) अशा, दिवसाही सूर्यप्रकाश तळापर्यंत पोहोचू न शकणाऱ्या दरीचा विश्वचमत्कार आहे. ही माहिती मलाही काही फार पूर्वीपासून नव्हती. रानवाटाचा यू-ट्यूबवरचा व्हिडिओ पाहून बरीचशी कल्पना आली. काहीतरी खरेच अद्भूत आहे ह्याची जाणीव झाली. भंडारदरा ते अकोले प्रदेशातील जलसमृद्धीने येथल्या लोकांचे जनजीवन खूपच समृद्ध केलेले आहे. शेतीच्या बहरलेल्या प्रकाशचित्रांनी याची खात्रीच पटेल.

प्रवरा नदीच्या उण्यापुऱ्या २०० किलोमीटरच्या ऊर्जस्वल जलप्रवाहाभोवती वर्तमान महाराष्ट्रातील सर्वाधिक वेगाने विकसित होणारे पदभ्रमण, गिर्यारोहण, नौकाविहार इत्यादींकरताचे पर्यटनस्थळ विकासमान आहे. त्याची ही तोंडओळख वाचकास तेथे पर्यटनास प्रवृत्त करेल यात मुळीच संशय नाही.

**संदर्भ:**

१) श्री अमृतेश्वर मंदिर, रतनवाडी https://www.discovermh.com/amruteshwar-temple-ratanwadi/

२) भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, औरंगाबाद मण्डल, फेब्रुवारी २०२२

३) अकोले माझा https://www.akolemaza.com/

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

(पृष्ठ क्र. ८ वरून-**अथर्ववेदाचे मूर्धन्य विद्वान श्री श्रीधरशास्त्री अडी**)

खरोखर वैदिक जगताची हानी मोठी झाली जी की पुन्हा भरून निघणारी नाही. असा हा एक अवलीया वैदिक निजानंदात मग्न असणारा वैदिक जड पदार्थांवरही आपली सत्ता चालवणारा मंत्रज्ञ ब्रह्मध्वज घेऊन सत्यलोकात अथर्ववेद पारायण करण्यासाठी निघून गेला.

त्यांच्या या जाण्याने मन आता अतीशय उद्विग्न झाले आहे. त्यांच्या चरणी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून ही लेखणी थांबवितो.

**– वेदान्तरत्न प्रमोदशास्त्री कुलकर्णी**
आचार्य वेदशास्त्र पाठशाळा, परभणी
भ्रमणध्वनी : ९४०३९६०२९३
श्री कृष्णशास्त्री पळसकर, नाशिक

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहे.**

**– संपादक**

# ड्रॅगनच्या एकाधिकारशाहीला तडे

*शैलेंद्र देवळाणकर, परराष्ट्र धोरण विश्लेषक यांनी चीन मधील घडामोडीचा आढावा प्रस्तुत लेखात घेतला आहे - संपादक*

चीनमधील शी झिनपिंग सरकारने कोरोना नियंत्रणासाठी राबवलेल्या 'झिरो कोव्हिड पॉलिसी'च्या विरोधात शांघाय, बीजिंग, वुहानसह अनेक महत्त्वाच्या शहरांमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन सुरू झाले आहे. या आंदोलनाने चीनने जगासमोर मांडलेले सारं काही आलबेल असल्याचे चित्र पूर्णतः फसवे होते ही बाब स्पष्ट केली आहे. वरकरणी हे आंदोलन कोविड पॉलिसी विरोधातील असल्याचे दिसत असले, तरी त्यामध्ये चीनमधील साम्यवादी पक्षाच्या अनियंत्रित एकाधिकारशाही विरोधातील असंतोष स्पष्टपणाने दिसत आहे. हा अंतर्गत संघर्ष झिनपिंग यांच्यासाठी खूप मोठे आव्हान ठरणार आहे.

चीनमध्ये सर्व काही आलबेल नाही. जगाला जे जे शी झिनपिंग दाखवण्याचा प्रयत्न करत होते त्याहून वास्तव हे विपरीत आहे. एकविसावे शतक हे आशिया खंडाचे शतक असून, या शतकात संपूर्ण वैश्विक राजकारण चीनभोवती केंद्रित असणार आहे. अमेरिका व पश्चिम युरोपियन राष्ट्रे आंतरराष्ट्रीय राजकारणात लयाला जात आहेत. त्यामुळे येणारा काळ हा आमच्या प्रभुत्वाचा आहे, असे म्हणणाऱ्या शी झिनपिंग यांना अलीकडेच तिसऱ्या टर्मसाठी राष्ट्राध्यक्षपदासाठी निवडण्यात आले. या निवड समारंभावेळी जिनपिंग यांनी २०५० पर्यंत अमेरिकेला मागे टाकून चीनला पहिल्या क्रमांकाची जागतिक आर्थिक महासत्ता बनवण्याचे उद्दिष्ट मांडले होते. ते मांडताना झिनपिंग यांना या वाटेवर कोणतेही अडथळे नसतील आणि चीनलाही महासत्ता बनण्यापासून आता कोणीही रोखू शकत नाही, असे एक आभासी चित्र निर्माण करण्यात आले होते. परंतु या स्वप्नांना गालबोट लागणारी परिस्थिती चीनमध्ये निर्माण झाली असून ती ऐतिहासिक स्वरूपाची आहे. कारण गेल्या काही दशकांमध्ये अशी परिस्थिती कधी अनुभवायला मिळाली नाही.

काय घडतंय नेमकं चीनमध्ये?

चीनमधील शहरी भागांमधून सरकारविरोधी निदर्शने करणारे हजारो आंदोलक रस्त्यावर उतरले आहेत. हे आंदोलन चिनी सरकारने 'झिरो कोविड पॉलिसी'अंतर्गत जनतेवर लादलेल्या निर्बंधांच्या विरोधासाठी आहे. या निर्बंधांना कंटाळून, त्रासून चिनी जनता उद्विग्न होऊन रस्त्यावर उतरली आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे चीनमध्ये कोरोनाचा उद्रेक झाला असून, दररोज ४० हजार नवे कोरोनाबाधित आढळून येत आहेत. ही परिस्थिती चीनसाठी अत्यंत धोकादायक आहे. वास्तविक, संपूर्ण जगाने कोरोना महामारीवर मात केल्यासारखी स्थिती असताना या विषाणू संसर्गाचा उगम ज्या देशातून झाला तो चीन पुन्हा एकदा कोरोनाच्या मगरमिठीत अडकताना दिसत आहे. यामुळे चीनचे धाबे दणाणले आहेत.

'आम्ही कोरोनावर मात केलेली आहे, कोरोनाचा आमच्या औद्योगिक विकासावर, उत्पादनावर कोणताही परिणाम झालेला नाहीये, कोरोनावर मात करून आम्ही पुन्हा एकदा प्रबळ देश म्हणून पुढे आलेलो आहोत' असे गुलाबी चित्र जगासमोर मांडण्याचा जो चीनचा

प्रयत्न सुरू होता, त्या चित्राला किंवा दाव्याला या आंदोलनाने छेद दिला आहे. कारण कोरोनाची परिस्थिती चीनमध्ये दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे यामुळे चीनमधील अंतर्गत परिस्थिती बिघडत चालली आहे. चीनने या आंदोलनकर्त्यां विरुद्ध दडपशाही सुरू केली असून, त्यामध्ये १० आंदोलकांचा मृत्यू झाला आहे. शांघायमधून सुरू झालेल्या या आंदोलनाचे लोण आता बीजिंगपर्यंत जाऊन पोहोचले आहे. कोरोनाचा उगम ज्या वुहान शहरामध्ये झाला तेथेही आंदोलनकर्ते रस्त्यावर उतरले आहेत.

या आंदोलनातील ठळक बाब म्हणजे त्यामध्ये झळकणारे बॅनर्स. आम्हाला स्वातंत्र्य द्या, सरकारी दडपशाही थांबवा, कोरोनाचे निर्बंध हटवा असे फलक झळकावत हजारो चिनी नागरिक स्वातंत्र्याचा नारा देत आक्रोश करताहेत. वरवर हे आंदोलन कोरोनाच्या निर्बंधांविरुद्धचे वाटत असले तरी त्यामागचा मुख्य रोख चीनमधील कम्युनिस्ट पक्षाच्या एकाधिकारशाही राजवटीविरुद्ध आहे आणि शी झिनपिंग यांच्या हुकुमशाहीविरुद्ध आहे. त्यामुळे झिनपिंग यांच्या साम्राज्याला तडे जाण्याच्या शक्यता त्यातून स्पष्टपणाने प्रतिबिंबित होत आहेत, हे लक्षात घ्यायला हवे.

वास्तविक पाहता, चीनचे राष्ट्राध्यक्ष म्हणून तिसऱ्यांदा शी झिनपिंग यांची निवड केली जाणार होती तेव्हाही काही फलक झळकले होते, ज्यामध्ये झिनपिंग यांच्या हुकुमशाहीचा विरोध करण्यात आला होता. त्यामध्ये स्वातंत्र्याची आणि अधिकारांची मागणी करण्यात आली होती. परंतु नेहमीप्रमाणे चीनने दुंडकेशाहीच्या बळावर हे आंदोलन दडपून टाकले होते.

चीनमध्ये १९८९ नंतर अशा प्रकारची परिस्थिती पहिल्यांदाच पहावयास मिळत आहे. १९८९ मध्ये चीनमध्ये ऐतिहासिक आंदोलन झाले होते. हे आंदोलन प्रामुख्याने विद्यार्थ्यांचे होते. पण चिनी सैन्याने बीजिंगमधील तियानानमेन स्क्वेअरच्या चौकात गोळीबार करत आंदोलकांना चिरडून टाकत, अटक करत ते पूर्णतः लष्करी बळावर दडपले होते. या दडपशाहीमध्ये ३ हजारहून अधिक जणांचा मृत्यू झाल्याचे समोर आले होते. अनेक अभ्यासकांच्या मते, सध्या सुरू असलेले आंदोलन जरी कोविड निर्बंधांना विरोध करणारे दिसत असले तरी त्याच्या मुळाशी शी झिनपिंग यांच्या अनियंत्रित हुकुमशाहीविरोधातील राग आहे. या आंदोलनामध्ये आणि १९८९ च्या आंदोलनामध्ये गुणात्मक फरक आहे. ते आंदोलन हे बीजिंग शहरापुरते मर्यादित होते आणि मुख्य म्हणजे त्याला कोणाचेही नेतृत्व नव्हते. ते उत्स्फूर्तपणाने झालेले आंदोलन होते. त्याचा प्रसारही फारसा झालेला नव्हता. आताचे आंदोलन हे चीनमधील प्रमुख शहरांमध्ये पसरलेले असून त्याची व्याप्ती फार मोठी आहे. दुसरी गोष्ट म्हणजे, १९८९ मध्ये सोशल मीडिया प्रचलित झालेला नव्हता. पण आता सोशल मीडियाच्या माध्यमातून संपूर्ण चीनमध्ये या आंदोलनाचा प्रसार होत आहे.

सध्याच्या निदर्शनामधील आणखी एक पैलू महत्त्वाचा आहे. चीनच्या शिनशियांग प्रांतातील उईघूर मुसलमानांवर गेल्या काही वर्षांपासून चिनी शासनाकडून कमालीची अमानवी दडपशाही सुरू आहे. त्यांचे अत्यंत अमानुषपणाने हाल केले जात आहेत. याविरोधात उठणारे त्यांचे सूर दडपले जात आहेत. सध्याच्या आंदोलना-दरम्यान अशाही घोषणा दिल्या जात आहेत की, चिनी जनता उईघूर प्रांतातील मुसलमानांच्या सोबत आहे, पाठिशी आहे. या अल्पसंख्यांकांविषयी सद्भावना आणि सहानुभूती व्यक्त केली जात आहे. ही बाब चीनसाठी अत्यंत धोक्याची असून, यामुळे चीनच्या अखंडत्वालाही धोका निर्माण होऊ शकतो. ही सर्व परिस्थिती लक्षात आल्यामुळेच शी जिनपिंग हे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करताहेत.

एकंदरीतच, शी झिनपिंग यांचा पुढील प्रवास हा सुखनैव, अडथळे विरहित असणार नाही ही बाब या आंदोलनाने पूर्णपणे स्पष्ट केली आहे. येत्या काळात त्यांना अंतर्गत विरोधाच्या मोठ्या आव्हानाचा सामना करावा लागणार आहे. दुसरी गोष्ट म्हणजे, चीनमधील साम्यवादी पक्षाच्या अनियंत्रित एकाधिकारशाही राजवटीला कसलाही धोका निर्माण होणार नाही अशी व्यवस्था तयार करण्यात आली होती; परंतु चिनी जनतेत त्याविरोधात कमालीचा असंतोष आहे.

या आंदोलनातून आणखीही काही संकेत मिळताहेत. कोरोनावर आम्ही पूर्णपणे नियंत्रण मिळवल्याचा चीनचा दावा हा पूर्णपणे फसवा असल्याचे स्पष्ट झाले आहे. चीनच्या अर्थव्यवस्थेला कोरोनाचा खूप मोठा फटका बसला आहे. कोरोनाविरुद्ध चीनने तीन लसी विकसित केल्या होत्या. यापैकी सायनोव्हॅक्स ही लस सर्वांत महत्त्वाची होती आणि चीनकडून या लसीची मोठ्या प्रमाणावर निर्यातही करण्यात आली होती. पण या लसीच्या परिणामकारतेवरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कारण चीनने जवळपास ८० ते ९० टक्के लोकसंख्येचे लसीकरण पूर्ण केले असूनही तेथे कोरोनाचा प्रसार होत आहे. याचा अर्थ चीनने विकसित केलेल्या लसी बोगस आहेत. या लसींची परिणामकारकता ६० ते ७० टक्के असल्याचा दावा चीनकडून करण्यात आला होता; परंतु ती ३० टक्केही नाही हे आता दिसून आले आहे. प्रगत राष्ट्रातील फायझरसारख्या कंपन्यांनी विकसित केलेल्या कोव्हिड प्रतिबंधक लसींची परिणामकारकता ८० टक्क्यांपर्यंत होती; तर भारताने विकसित केलेल्या कोव्हिशिल्ड, कोव्हॅक्सिनसारख्या लसींची परिणामकारकता ८० ते ८५ टक्के होती. या लसींच्या साहाय्यानेच भारताने एक अब्ज लसीकरणाचा टप्पा पूर्ण केला आणि आज आपण कोरोनावर पूर्णतः मात केली आहे. असे असताना चीनमध्ये कोरोनाचा वाढता उद्रेक हा त्यांच्या लसी या कुचकामी ठरत असल्याचे स्पष्ट करतो. या लसी निर्यात केलेल्या देशांमध्येही परिस्थिती समाधानकारक नाहीये. विशेषतः पाकिस्तानमध्ये चीनने सायनोव्हॅक्स लसीची निर्यात मोठ्या प्रमाणावर केली होती; पण तेथेही ही लस परिणामकारक ठरली नसल्याचे दिसून आले होते.

ताज्या आंदोलनाचे लोण हे केवळ चीनपुरते मर्यादित राहणार नसून, ते तैवान आणि तिबेटमध्ये, हाँगकाँगमध्ये पसरण्याची शक्यता आहे. कारण गेल्या तीन महिन्यांपासून तिबेटची राजधानी ल्हासा येथे चीनने पूर्णपणे लॉकडाऊन घोषित केले आहे. तेथील जनतेत याबद्दल प्रचंड असंतोष आहे. त्यामुळे येत्या काळात झिनपिंग यांच्यापुढील अडचणी वाढण्याची शक्यता दिसत आहे.

चीनमधील या परिस्थितीचा फायदा अमेरिकेकडून घेतला जाण्याची शक्यता आहे. कारण तैवानच्या मुद्द्यावरून चीन आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष अद्यापही कायम आहे. अमेरिकेने तैवान आणि हाँगकाँगला उघड समर्थन दिलेले आहे. चीनमध्ये लोकशाही अधिकार रुजवले जावेत या दृष्टिकोनातून अमेरिकेची प्रसारमाध्यमे प्रयत्नशील असतात. त्यामुळे आत्ताच्या आंदोलनाची संधी अमेरिका दवडणार नाही.

भारतात जेव्हा कोरोनाची पहिली लाट आली होती तेव्हा 'ग्लोबल टाईम्स' या चीनच्या सरकारी अधिकृत माध्यमाने भारताची अनेकदा खिल्ली उडवली होती. भारताच्या लसींची परिणामकारकता नसल्याची टीका केली होती. भारतात शेकडो लोकांचा कोविडवरील उपचार न मिळाल्यामुळे बळी जात असल्याचा अपप्रचार केला होता. याबाबत रकानेच्या रकाने भरून लेख लिहिले गेले. पण कोरोनावर मात करून भारताने संपूर्ण

(पृष्ठ क्र. २० वर)

# विज्ञान प्रसाराची मूलतत्त्वे

*डॉ. वा.ना. बेडेकर यांच्या एकोणिसाव्या स्मृतीदिनाचा कार्यक्रम शुक्रवार दि. १४ एप्रिल २०२३ रोजी आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी प्रमुख वक्ते श्री. अ.पां. देशपांडे यांचे 'विज्ञान प्रसाराची मूलतत्त्वे' या विषयावर व्याख्यान झाले. त्या व्याख्यानाचा घोषवारा – संपादक*

भारतातील सामाजिक वातावरण पाहिले तर ते आजच नव्हे तर गेली शेकडो काय, पण हजारो वर्षे धार्मिक राहिले आहे. आणि असे वातावरण असणारा जगातला भारत हा एकमेव देश नसून असे अनेक देश आहेत. किंबहुना ज्या युरोप-अमेरिकेचा आपण डंका वाजवतो, तेथेही वेगळे वातावरण नव्हते. पृथ्वी स्थिर असून, तिच्याभोवती सूर्य फिरतो हे मत बायबलला मान्य नाही म्हणून ब्रुनोचा बळी गेला आणि 'इतरांचे न ऐकता तुमचा निर्णय तुम्ही घ्या' हे सांगणाऱ्या सॉक्रेटिसचाही बळी गेला हे तुम्ही वाचले तर तुम्हाला माझ्या विधानाची सत्यता पटेल. जगाची लोकसंख्या वाढली. नाना विषयातील शिक्षण दिले जाते. देव-धर्माचे करून आजारी माणूस बरा होत नाही, की कोणी परीक्षेत पास होत नाही की कोणाला ऑफिसमध्ये बढती मिळत नाही; तरी लोक देवाला साकडे घालतच राहतात. एका लहान मुलाला त्याची आई म्हणाली, 'दुसऱ्याकडे गेल्यावर तू काही मागत जाऊ नकोस. ते भिकारड्याचे लक्षण आहे', त्यावर मुलगा म्हणाला, 'मग तू देवापाशी सतत काही काही मागत असतेस ते भिकारड्याचे लक्षण नाही का?' शिकले सवरलेले लोकही देवाधर्माच्या मागे लागलेले आपण पाहतो, पण ते काहीच नाही; आपापल्या प्रयोगशाळेत शास्त्रज्ञाचे काम करणारे वैज्ञानिक आठ तास शास्त्रज्ञ असतात. घरी जाताना ते आपली वैज्ञानिक दृष्टी प्रयोगशाळेत ठेवून जातात. घरी गेल्यावर त्यांची पूजा-अर्चा, जपजाप्य चालू असते २०-२५ वर्षांपूर्वी बीएआरसीत संचालक झालेल्या एका व्यक्तीने आपला पदभार स्वीकारण्यापूर्वी सिद्धिविनायकाला अभिषेक केला आणि मग पद स्वीकारले; तर दुसरे वैज्ञानिक निवृत्त झाल्यावर पूर्ण वेळ सत्य साईबाबांचे भक्त व मदतनीस झाले. कुठे गेला वैज्ञानिक दृष्टीकोन? मुलाला, 'खरे बोल' असा उपदेश करणारे बाबा, नको असलेल्या व्यक्तीचा फोन आला की, 'बाबा घरात नाहीत सांग' असे मुलाला दरडावून सांगतात. हा मुलगा पुढे जाऊन जर खोटेच बोलू लागला तर त्याला आपण कसा दोष देणार? समाजात नाना स्वभावाची माणसे आढळतात. इस्त्री केलेल्या कपड्यासारखी सर्व माणसे एकसारखी आणि एकाच स्वभावाची आढळणार नाहीत. आणि तशी ती आढळली तर आपल्या जगण्यातील मजा निघून जाईल. पण समाजातील भोंदूपणा घालवता आला तर प्रयत्न व्हायला हवा. या समाजात काही भोंदू बाबांनी त्यावर आपला व्यवसायच सुरू केला असून तो इतर कोणत्याही, हो अगदी सध्या जास्तीत जास्त पैसे मिळवून देणाऱ्या आयटी क्षेत्रापेक्षाही जास्त पैसा मिळवून देणारा आहे. मुळात काय आहे की, आपापल्या वैयक्तिक आयुष्यातील जी दु:खे आहेत, त्यामुळे मन कमकुवत झालेले असते, उदा. नोकरी नसणे, करत असलेल्या नोकरीत / व्यवसायात पुरेसे पैसे न मिळणे, मिळत असलेल्या मासिक आमदनीपेक्षा महत्त्वाकांक्षा फार असणे, मूल नसणे, दुर्धर आजार असणे, आजार बरा करण्यासाठी लागणारे पैसे जवळ नसणे इत्यादी इत्यादी. या कारणाने लोक देवधर्माकडे आणि बाबा-मां यांच्याकडे वळतात. बरं, वळले तरी हरकत नाही, जर त्यांना यातून मन:शांती लाभत असेल तर त्याला कोणी हरकत घ्यायचे कारण नाही, पण

जे दयाळू नसतात तेच खऱ्या अर्थाने कुरूप असतात.

त्यावर अंध विश्वास ठेवून आपण वागू लागलो तर घात झाला असे समजावे. उदा. हा अंगारा लावा, म्हणजे तुम्हाला मूल होईल. निदान दहावीपर्यंत शिकलेल्या लोकांना मूल कसे होते, हे सांगायला नको. अंगाऱ्याने काय होणार याचा ते काडीचाही विचार करत नाहीत, याचे आश्चर्य वाटते. यावेळी ते आपली बुद्धी कुठे गहाण ठेवतात हे समजत नाही. याही पुढचा कळस म्हणजे आपली बायको बाबाला एकांतात भेटवली की मूल झालेच समजा आणि त्याचा प्रचार मग आणखी शंभरजणीत होतो. बाबाकडे गेल्याने असे काही झाले तर ते अनेकांना सांगितले जाते, पण काही झाले नाही तर ते कोणी कोणाला सांगत नाही ! बरं ही तर सामान्य माणसे आहेत, पण आपले नेतेही यात कमी नाहीत. तेही अशा अनेक बाबांचे भक्त आहेत. मी त्यांची नावे घेतली पाहिजेत असे नाही. आणि नेते जातात तर त्यात काही तथ्य असले पाहिजे असे समजून सामान्य माणसेही जातात. गणपती उत्सवात तर या नेते लोकांना उत येतो. येथले नेते केवळ राजकीत नसतात तर क्रीडा, सिनेमा, नाटक अशा अनेक क्षेत्रांतील असतात. आपण देवाला राजापेक्षा मोठा मानतो, पण गणपती उत्सवात तर बारीक बारीक गावाचा गणपती हा त्या गावाचा राजा असतो. सध्या जानेवारी ते एप्रिल महिन्याचा काळ हा गावोगावच्या जत्रांचा काळ असतो आणि या जत्रेतील देवाला खूश करण्यासाठी किती कोंबड्या आणि शेळ्या-मेंढ्यांचा बळी जातो याला गणतीच नाही. याच्यापुढचा कडेलोट म्हणजे नरबळीचा. ते सर्रास होत नाहीत हे त्यातल्यात्यात बरे, पण ते अजिबात होत नाहीत असेही नाही. मराठवाड्यातील एका गावी २-३ महिन्यांचे मूल अधिक जगावे म्हणून त्याला उंच जागेवरून फेकतात आणि खाली कोणीतरी त्याला झेलतात! या क्रूर गोष्टींपेक्षा काही सौम्य गोष्टीही समाजात चालू असतात. अनेक मुले न जगणाऱ्या माणसाच्या नवीन मुलाचे नाव 'दगड्या' अथवा मुलीचे नाव 'धोंडी' ठेवले तर ते जगते. पूर्वी समाजात अनेक रोग होते आणि त्याला योग्य औषधे उपलब्ध नव्हती, यामुळे बालमृत्यूचे प्रमाण मोठे होते, हे कोणी लक्षात घेत नसे. म्हणून ७०-८० वर्षांपूर्वी एकेका माणसाला १० ते १५ मुले असत. अशा वेळी त्या बाईचे काय हाल होत असतील याची कोणी दखल घेत नसे. शहाजहान बादशहाची बायको मुमताज ही तिच्या १९ वर्षांच्या वैवाहिक आयुष्यात चौदाव्या बाळंतपणात मेली म्हणून तिच्या स्मरणार्थ ताजमहाल बांधला. आपल्याकडे तुळशी वृंदावन बांधतात. आपले माजी राष्ट्रपती वराह गिरी वेंकट गिरी एकदा म्हणाले होते की, 'मी माझ्या वडलांचे चौदावे अपत्य असून मलाही चौदा मुले आहेत.' आणि हे ते केव्हा म्हणाले, तर त्यांना एकदा कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमात बोलावले होते तेव्हा ! त्यावर आचार्य अत्रे यांनी मराठा वर्तमानपत्रात दुसऱ्या दिवशी एक व्यंगचित्र छापले होते. त्यात मुलांचा डोंगर दाखवून 'गिरी' यांची ''कामगिरी'' असे म्हटले होते.

वरील सर्व गोष्टींचा विचार करता समाजात वैज्ञानिक दृष्टीकोन पसरवणे किती महत्त्वाचे आहे ते आपल्या लक्षात येईल. मुळात विज्ञान म्हणजे काय हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. वनस्पती शास्त्रात झाडे, फुले, फळे कशी येतात, त्यात कोणकोणत्या जाती आहेत, एकाच पिकाच्या कोणत्या वेगवेगळ्या जाती आहेत हे समजणे आवश्यक आहे. उदा. आंबा हे एकच फळ घेतले तरी हापूस, पायरी, मलगोबा, रायवळ, आम्रपाली, नीलम, केसर, दशेरी, बैगनपल्ली, तोतापुरी, लंगडा, बदामी या जाती तर आपल्याला माहीत आहेत, पण मानकुराद, हत्ती, सुवर्णरेखा, सिंधू वनराज, मालगीज, मल्लिका, भोपाली, भागमभाग, बोरशा, नागीण, खोबऱ्या या जाती कुठे आपल्याला ठाऊक आहेत? मी मुळातला सातारा जिल्ह्यातील शिरवळ गावाचा. आता ते पुणे जिल्ह्यात आले आहे. तेथील रायवळ आंब्याच्या जातीत फणशा, तेलकट शेंद्र्या, साखरगोटी, वेलदोडे गोटी, राघ्या, गाडग्या अशा जाती होत्या. आणि ही तर वानगी आहे. अशा आणखी कित्येक जाती असणार. वेगवेगळी फळे पाहिली तर त्यांच्यावरचे आवरण बघून

तुमची प्रतिष्ठा जेवढी मोठी तेवढी तुमची बदनामी जास्त !

त्यांची विविधता घ्यानात येते. द्राक्षे, चिकू, पेरू यांच्या साली आपल्या त्वचेसारख्या पातळ असतात आणि त्यासकट ही फळे आपण खाऊ शकतो. उलट पपईची सालही पातळ असली तरी ती आपण खात नाही. फणस, अननस यांच्या अंगावर काटे असतात. नारळाला तर दुहेरी आवरण असते. वरचे आवरण सोलून काढावे लागते व पुढच्या आवरणासाठी नारळ फोडावा लागतो. सगळ्यात मजेशीर आवरण केळ्याचे असते. ते खाताना आपल्या बोटांचा स्पर्श केळ्याला न करता ते आपल्याला खाता येते. डाळींबाचे दाणे तर किती सुरक्षित असतात. बाहेरच्या जाड आवरणाशिवाय आतही त्यावर पातळ आवरण असते. कलिंगडाची साल तर अर्ध्या इंच जाडीची असते. वनस्पतींचा उपयोग आपण शेतीद्वारे अन्न मिळवण्यात करतो. वनस्पतींपासून औषधे, कपड्यांसाठी कापूस, फर्निचरसाठी लाकूड आणि आणखी कित्येक गोष्टी मिळवतो. पण वनस्पतीपासून गणितातील कोणती कल्पना सुचली हे ऐकून आपण चक्रावून जाल. फार थोडी झाडे जमिनीवर काटकोनात उभी असतात. बाकीची लघुकोन अथवा विशालकोनात उभी असतात. झाडाला येणाऱ्या फांद्या, पाने, पानातील शिरा व उपशिरा हे सगळे कोनच आहेत. झाडाला जेथे फांदी फुटते तेथे फांदीभोवती एक गोळा तयार होतो. तेथे खोड कमकुवत होऊ नये म्हणून ती रिएनफोर्समेंटआहे. यातूनच अभियांत्रिकीत ही कल्पना आली. मोठमोठ्या टाक्यांतून इनलेट, आउटलेट पाईप जोडतात, तेथे टाकीला गोलाकार भोक पाडतात. उदा. १० सेंमी. व्यासाचा पाईप आहे, तर टाकीला १० सेंमी.चे गोल भोक पाडतात. त्यामुळे तेथे टाकी कमकुवत झाली. तो कमकुवतपणा घालवण्यासाठी पाईपच्या गळ्यात १० सेंमी. व्यासाचे क्षेत्रफळ असलेला वॉशर अडकवून तो टाकीच्या भोकाभोवती वेल्ड करतात. याला रिएनफोर्समेंट म्हणतात. निसर्ग आपल्या सर्व घडामोडींचा गुरू आहे.

आपले शरीर हाही म्हटले तर निसर्गाचाच एक भाग आहे आणि शरीर हे सर्व प्रकारच्या विज्ञानाचा गुरू आहे, पण अजूनही शरीर कुणालाच पूर्णपणे समजले नाही. जी जी रसायने आपण बाहेर वापरतो, ती ती सर्व रसायने शरीरात आहेत. भौतिकशास्त्रात अथवा अभियांत्रिकीत आपण अनेक प्रकारचे सांधे शिकतो, ते शरीरात आहेत. आपण मान कशी वळवतो, डोके कसे डावीकडे-उजवीकडे-वर-खाली करतो, कोपराचा सांधा, गुडघ्याचा सांधा, बोटांची हालचाल, मनगटाची हालचाल, खांद्याचा सांधा, कमरेची हालचाल. पाठीत वाकणे, मणक्यांची हालचाल. मग यात बिजागरीचा सांधा आला, उखळीचा सांधा आला, पार्लमेंटरी हिंज आली. काय आले नाही? शरीरात हवेचे वहन, अन्नाचे वहन कसे होते, ही वहन क्रिया पाहा. नाकाने आपण जी हवा घेतो, त्यात ७८ टक्के नायट्रोजन व २० टक्के ऑक्सिजन असतो, मग शरीरात त्याचे विघटन कसे होते? अन्नाची प्रक्रिया रक्तात, मलमूत्रात, विविध पाचक रसात कशी होते ते पाहा. मूत्र आणि विष्ठा विसर्जनाच्या वेळी तिथल्या व्हाल्व्हस कशा उघडतात ते पाहा. नाकाने वास घेऊन आपल्याला पदार्थाची ओळख पटते, नको ते वास आले तर आपण दूर जातो. जिभेने आपल्याला पदार्थांची चव समजते. वास आणि चव यावरून एखादा पदार्थ खायचा की नाही हे आपण ठरवतो. दाताने अन्न पदार्थाचे चर्वण होते. डोळ्यांनी आपल्याला त्रिमित चित्र दिसते. त्रिमित फोटो काढणे अजून कोणत्याही कॅमेऱ्याला जमले नाही. कानाने किती सूक्ष्म ऐकू येते ते पाहा. कदाचित वटवाघळाएवढे सूक्ष्म नाही ऐकू येणार तसेच डोळ्यांनी मांजरासारखे अंधारात दिसणार नाही हेही खरे. मेंदू हा तर सगळ्यात अजब अवयव आहे. यातून संदेश वहन कसे होते ही आश्चर्याची बाब आहे. उदा. एखादे कुत्रे आपल्या अंगावर धावून येत असेल तर ते डोळ्यांनी पाहून, त्याचा आवाज कानांनी ऐकून इथे धोका आहे याचा संदेश मेंदूपर्यंत जातो आणि मग मेंदू पायाला आज्ञा देतो की 'इथून पळ.' आणि हे सर्व विजेचे बटन दाबल्यावर दिवा लागतो इतक्या क्षणार्धात होते. मेंदूची साठवण क्षमता ही आणखी एक अजब गोष्ट आहे. माझ्या वयाच्या

ऐंशीव्या वर्षीही मला बालवर्गापासून कालपर्यंतच्या आठवणी घडाघड सांगता येतात. त्यात पुन्हा काय सांगायचे, काय लपवून ठेवायचे, कोणती गोष्ट केव्हा सांगायची याचे तारतम्यही आपण कसे बाळगतो? लहानपणी मी पावकी, निमकी, पाऊणकी, सवाकी, दिडकी, अडीचकी, औऊटकी, आकरकी पाठ केलेली अजूनही कशी आठवते आणि त्यामुळे कॅलक्यूलेटरच्या अगोदर मी हिशेब कसा करू शकतो? शरीरातल्या या क्रिया पाहूनच आपण कॅमेऱ्यासह अनेक गोष्टी कशा बनवल्या ते पाहा.

इलेक्ट्रॉनिक्स, जैवरसायनशास्त्र, न्यूरॉलॉजी अशी कोणतीही बाब घ्या, त्याचे मूळ शरीराशी संबंधीत आहे. अजूनही डॉक्टर लोकांना संपूर्ण शरीर समजले नाही. रोग कोणत्या कारणाने होतो याबाबत ते चाचपडत असतात. आपण प्रवासाला जाताना एका बॅगेत सर्व सामान कसे बसवायचे हा प्रश्न आपल्याला सतावित असतो, पण शरीराचे अवयव किती छोट्या जागेत कसे बसवले आहेत, हे सर्जन लोकांना विचारा. केमिकल इंजिनिअरिंगमधील स्पार्जरची संकल्पना आपल्या त्वचेवर कशी रंध्रे असतात, त्यावरून सुचली असणार. शरीराच्या रचनेवरून पॅकिंग उद्योगाने अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. एक सुरक्षिततेचा मुद्दा जरी लक्षात घेतला तरी बोटाची पेरे सुरक्षित राहावीत म्हणून वर नखाचे संरक्षक आवरण दिलेले असते ते पाहा. डोळ्याला इजा होऊ नये म्हणून डोळा झाकण्यासाठी पापणी व डोळा उघडा असताना पापणीवरचे केस दिलेले असतात. डोक्याला ऊन, पाऊस, थंडीपासून संरक्षण मिळावे म्हणून केस असतात. नाकात जाणारी हवा धुळीपासून सुरक्षित रहावीत म्हणून नाकात केस असतात. आतील अवयव सुरक्षित राहावेत, म्हणून संपूर्ण अंगावर त्वचा असते. तीही किती पातळ असते पाहा. तोंडात नको असलेल्या गोष्टी जाऊ नयेत म्हणून ओठ बंद करता येतात. स्वरयंत्र कानाच्या अंतर्भागात सुरक्षित ठेवले आहे. पाय जमिनीवर टेकून घासला जाणार म्हणून टाचेची कातडी जाड बनवली आहे. नीट बोलता यावे म्हणून दन्त्य, तालव्य, मूर्धन्य असे प्रकारही आहेत. ते वैविध्य दाखवतात.

स्वयंपाकघर ही आपल्या घरातील मोठी प्रयोगशाळा आहे. त्यातून आपण गाळणे, चिरणे, कापणे, किसणे, उलटणे, मुरवणे, आंबवणे, खारवणे, गोडवणे, विरजण लावणे, पाखडणे, निवडणे, भाजणे, वाफलणे, तळणे, उकडणे, भिजवणे, लाटणे, शिजवणे, गरम करणे, उकळवणे, निवळणे, फोडणी करणे, श्रीखंडाला रंग यावा म्हणून केशर घालून ते रंगवणे, मुरड घालणे, हलवा करताना मधून मधून साखरेचा पाक घालून तो विस्तवावर हलवणे अशा अनेक क्रिया पाहतो. याच क्रिया मोठ्या प्रमाणावर रसायन उद्योगात केल्या जातात.

श्रोतेहो, हे सर्व विज्ञान नाही का? हे समजून न घेता अथवा त्याला वळसा घातला तर ते बिघडते. विज्ञानातील प्रयोग पद्धतशीरपणे करावे लागतात. त्यात शॉर्ट कटस नाहीत. शिवाय विज्ञान हे जगात कुठेही एकच असते. ज्या पद्धतीने मुंबईच्या प्रयोगशाळेत ऑक्सिजन बनतो, त्याच पद्धतीने तो न्यू यॉर्क अथवा आफ्रिकेतही बनतो. विज्ञानात निरीक्षण, प्रयोग, निष्कर्ष या तिन्ही गोष्टींना महत्त्व आहे. ही पद्धत फक्त शास्त्रज्ञांच्याच उपयोगाची नसून ती सर्वांनाच एकसारखी उपयोगी पडणारी आहे. शेतकऱ्याला निरीक्षण करूनच कोंब आल्यावर पीक कसे येणार याचा अंदाज बांधता येतो, किंवा मोहोर बघून यंदा आंबा किती येणार ते सांगता येते अथवा पाने पिवळी पडली म्हणजे पिकाला कोणता रोग होणार हे ओळखता येते, ते कशावरून तर निरीक्षणावरून. मग जर एखादी गोष्ट त्याला नव्याने आढळली किंवा एखादे नवीन सुधारीत वाण त्याला मिळाले तर तो ते शेताच्या एका भागात लावून प्रयोग करून पाहतो. आणि तो यशस्वी झाला तर निष्कर्ष काढून संपूर्ण शेतात लावतो. १९६५ साली मेक्सिकोहून भारताने जास्त उत्पन्न देणाऱ्या गव्हाचे बियाणे आणून ते पंजाबात लावले आणि मेक्सिकोपेक्षा तेथे जास्त

उत्पादन मिळाल्याचे पाहून मग ते संपूर्ण देशात लावले. ही त्यावेळी हरित क्रांती म्हणून संबोधली गेली. आणि मेक्सिकोपेक्षा भारतात जास्त पीक कसे आले ते बघायला या सुधारीत वाणाचे संशोधक स्वत: नॉर्मन बोरलॉग पंजाबमध्ये आले होते. दुकानदाराला माल केव्हा विकत घ्यावा आणि तो केव्हा विकावा हे सुद्धा निरीक्षणावरून समजते, एवढेच काय कथालेखक लोक वर्षभर कथा लिहून त्या दिवाळी अंकात देतात, कारण त्यावेळी कथेचे मानधन अधिक मिळते आणि वाचकही मोठ्या संख्येने लाभतात.

शेवटी, विज्ञान प्रसाराची मूलतत्त्वे काय आहेत, तर समाजातील अंधश्रद्धा दूर करणे, का, कसे, केव्हा, कधी, कोणाचे असे प्रश्न विचारून त्याची स्वत:ला पटणारी उत्तरे मिळतील त्याप्रमाणे वागणे. हाच वैज्ञानिक दृष्टीकोन आहे. निसर्गाचे निरीक्षण करणे आणि सतत प्रयोग करीत रहाणे यातच प्रगती दडलेली आहे. समाज जितक्या प्रमाणात वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगेल, तितका तो प्रगत होईल.

विज्ञान प्रसार आणखी कशासाठी करायचा? तर त्यातून काही वैज्ञानिक निर्माण व्हावेत. कशाला हवेत वैज्ञानिक? तर संशोधन करून त्यांनी नोबेल पुरस्कार मिळवला नाही तरी त्यांनी या समाजाचे प्रश्न सोडवावेत. म्हणजे नोबेल पुरस्कार आम्हाला नको असे होत नाही, तो तर आम्हाला हवाच आहे. आमचे मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष प्रा.जे.बी.जोशी असे प्रश्न शोधून काढतात व ते त्यांच्या एकेक पी.एच.डी. करू इच्छिणाऱ्या मुलांना अभ्यासासाठी देतात. उदा. बेदाणे, चिलखते, काजू, आंबे, फणस, नारळ इत्यादी. नंदूरबार येथील मिरची उत्पादकांचे प्रश्न.

**– अ.पां. देशपांडे**
भ्रमणध्वनी : ९९६७८४१२९६
E-mail : apd1942gmail.com

●●●

(पृष्ठ क्र. १५ वरून – **ड्रॅगनच्या एकाधिकारशाहीला तडे**)

जगापुढेच एक आदर्श घालून दिला. आजघडीला भारतात दररोज केवळ १०० ते १५० कोविड बाधित रुग्ण आढळताहेत. कोरोनाचा भारतातील प्रभाव अत्यंत क्षीण झाला आहे. दुसरीकडे चीनमध्ये मात्र रोज ४० हजार कोविडबाधित आढळत आहेत. यातून कोव्हिशिल्ड आणि कोव्हॅक्सिन या लसींची परिणामकारकताही स्पष्ट झाली आहे. भारताने ज्या-ज्या देशांना या लसींची निर्यात केली तेथेही त्यांची परिणामकारकता दिसून आली आहे. भूतान हे याचे आदर्श आणि उत्तम उदाहरण आहे. ही बाब चीनला चपराक देणारी आहे.

सारांश, कोरोना विषाणूचे बूमरँग चीनवर उलटले आहे. एकविसाव्या शतकातील २०२० हे दशक आंतरराष्ट्रीय राजकारणाला कलाटणी देणारे ठरले आहे. कोरोना महामारी, रशिया-युक्रेन युद्धानंतर आता चीनमधील अंतर्गत संघर्ष उफाळून आला आहे. भारत या संपूर्ण काळामध्ये अत्यंत संयमाने वागला आहे. कोरोनाच्या दोन लाटांवर मात करून भारताचा आर्थिक विकासाचा दर आज ६ ते ७ टक्क्यांवर पोहोचला आहे. भारताची निर्यात ४०० अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. भारताची अर्थव्यवस्था इतर देशांपेक्षा निश्चितच सक्षम बनली आहे. इंग्लंडला मागे टाकून तिसऱ्या स्थानावर भरारी घेणारा भारत येत्या काळात जपान आणि जर्मनीला मागे टाकत भारत नवी भरारी घेऊ शकतो. ही परिस्थिती भारताला सातत्याने कमी लेखणाऱ्या चीनला आत्मपरीक्षण करायला लावणारी आहे.

**– डॉ शैलेंद्र देवळाणकर**
संचालक
उच्च शिक्षण, महाराष्ट्र शासन
पुणे

●●●

# नौदलाच्या नव्या ध्वजाचे संकेत

*भारतीय नौदलाच्या नवीन ध्वजाचे अनावरण करत, तो ध्वज २ सप्टेंबर २०२२ रोजी माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आपल्या नौदलाला सुपुर्द केला या घटनेसंदर्भातील घेतलेला आढावा - संपादक*

२ सप्टेंबर २०२२ रोजी माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी भारतीय नौदलाच्या नवीन ध्वजाचे अनावरण करत, तो आपल्या नौदलाला सुपुर्द केला. ही एक महत्त्वपूर्ण घटना आहे.

१९४७ साली आपला देश ब्रिटिश राजवटीतून स्वतंत्र झाल्यापासून भारतीय नौदलाचा ध्वज बदलला जाण्याची ही पहिलीच वेळ नाही. असा बदल होण्याची ही चौथी वेळ आहे. तरीही हा बदल महत्त्वाचा आहे.

यावेळच्या बदलात इंग्लंडच्या युनियन जॅकशी नातेबन्ध सांगणारी खूण पूर्णपणे नाहीशी झाली आहे हा तो महत्त्वपूर्ण बदल आहे. तशा एका अर्थाने 'आजादी का अमृत महोत्सव' साजरा करण्याची ही वैशिष्ट्यपूर्ण पद्धत आहे याविषयी दुमत नसावे.

नौदलाच्या नवीन ध्वजाचे खरे वैशिष्ट्य म्हणजे त्यांतून दिले गेलेले विविध संकेत... स्थानिक ते जागतिक पातळीवरचे संकेत... राजकीय, सामाजिक, आर्थिक संकेत....

नौदलाच्या नवीन ध्वजातून दिलेला पहिला महत्त्वपूर्ण संकेत हा खऱ्या अर्थाने राजकीय धोरणात्मक आहे. ध्वजातून ब्रिटिश युनियन जॅक पूर्णपणे वगळला जाणे हे सर्वार्थाने Policy Statement आहे. 'जागतिक अर्थकारण आणि राजकारण यांत येणाऱ्या काळात आम्हाला देश म्हणून ना इंग्लंडची गरज आहे ना पूर्वाश्रमीच्या कॉमनवेल्थ समूहाची गरज आहे' असे ते कृतिशील सांगणे आहे. गेले काही महिने परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर ज्या तुफान पद्धतीने आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारतीय भूमिका सडेतोडपणे मांडत आहेत त्याचे हा ध्वज हे पुढचे पाऊल आहे. निर्भीड भारत हा त्यातून दिलेला पहिला संकेत आहे.

नौदलाच्या नवीन ध्वजात युनियन जॅक जाणे हे अजून एका अर्थाने सांकेतिक आहे. अजूनही इंग्लिश मानसिकता भारतीय वंशाचा रुशी सूनक इंग्लंडचा पंतप्रधान म्हणून स्वीकारू शकत नाही हे लीस ट्रस यांच्या विजयातून ब्रिटनमधे सिद्ध होत असताना आम्हीही तुमचे अस्तित्व नाकारतो हा तो संकेत आहे. इतिहास बदलता आला नाही तरी वर्तमान आणि भविष्य बदलता येते हा नौदलाच्या नवीन ध्वजाचा दुसरा संकेत आहे.

आजादी का अमृत महोत्सवला आत्मनिर्भर भारत ची देण्यात आलेली जोड हा नौदलाच्या नव्या ध्वजातून दिला जाणारा तिसरा संकेत आहे. ब्रिटिश युनियन जॅक जाणे हे जितके त्यादृष्टीने महत्त्वाचे आहेच; पण त्याहीपेक्षा तिथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेचा या ना त्या स्वरूपात समावेश होणे हे जास्त सांकेतिक आहे. या नव्या नौदल ध्वजाचे अनावरण करताना माननीय पंतप्रधानांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा 'भारतीय नौदलाचे उद्गाते' म्हणून केलेला आदरपूर्वक उल्लेख बरंच काही सांगून जाणारा आहे.

एकीकडे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती स्मारकाला विलंब होत असताना राष्ट्रीय - केंद्रीय

पातळीवर त्यांच्या राजमुद्रेचा समावेश होणे (तेही मुंबई महापालिकेच्या निवडणुका अक्षरशः तोंडावर असताना आणि महाराष्ट्रात अलीकडेच सत्तापालट झालेला असताना) हा स्थानिक – राज्यस्तरीय – राष्ट्रीय पातळीवर दिला गेलेला राजकीय संकेत आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांची राजमुद्रा अष्टकोनी आहे. त्याप्रमाणे भारतीय नौदल अष्टावधानी असेल हा त्यांतून दिला जाणारा चौथा संकेत आहे. भारतीय सीमारेषांना लागून आणि आजूबाजूला असणाऱ्या देशांना आणि त्यांच्या बोलवत्या धन्यांना दिलेला हा इशारा आहे.

नौदलाच्या नव्या ध्वजाचे अनावरण आणि भारतीय नौदलाचा मानबिंदू असणाऱ्या विक्रांतचे पुनरागमन हा निव्वळ योगायोग असू शकत नाही.

तसेच, हा ध्वज दिला जाणे आणि नंतरच्या आठवड्यात लगेचच राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि केंद्रीय गृहमंत्री मुंबईत येणे, हेही एका Pre- emptive सुरक्षेचा संकेत नवा ध्वज देतो आहे.

विक्रांत नौकेचे पुनरावतरण आणि नवा ध्वज यांचा संगम हा भारतीय अर्थव्यवस्था म्हणून दिलेला एक महत्त्वपूर्ण आणि पाचवा संकेत आहे. नौदलाचा ध्वज हे केवळ लष्करी गणित नसून, आता ते राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक संकेतही आहे. कोरोनाने बाधित झालेल्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी आत्मनिर्भर भारत घोषणा मार्च २०२० मधे देण्यात आली होती. गेल्या दोन – अडीच वर्षांत त्याबाबत खूप उत्साहवर्धक घटना, विशेषतः संरक्षण क्षेत्रात घडल्या आहेत याचा संकेत म्हणजे नौदलाचा नवीन ध्वज. मार्च २०२० मधे 'आत्मनिर्भर भारत' योजने अंतर्गत संरक्षण विषयक किमान ७५ टक्के उत्पादन देशातच करणे आणि २०० कोटी डॉलर्स पर्यंतच्या खरेदीसाठी फक्त भारतीय कंपन्यांनाच संधी देणे असे निर्णय जाहीर करण्यात आले. सुदैवाने त्यांची अंमलबजावणीही झाली. त्यामुळेच तेल, सोने, कोळसा या गोष्टींप्रमाणे संरक्षण विषयक बाबींबाबतही निव्वळ आयातीवर अवलंबून आपला देश राहणार नाही अशी वाटचाल सुरू झाली. इतकेच नव्हे तर, त्यांतून संरक्षण म्हणजे केवळ सीमांचे रक्षण हा मुद्दा जुना होत त्याला आयात – निर्यात हा पैलूही जोडला जाऊ लागला.

गेल्या दोन – अडीच वर्षांत माझगाव डॉक, भारत डायनामिक, भारत एलेक्ट्रिकल्स, हिंदुस्तान एरोनॉटिक, कोचीन शिपयार्ड या कंपन्यांच्या उत्पादन आणि आर्थिक कामगिरीत झालेली आकर्षक सुधारणा हा खरा नौदलाच्या नव्या ध्वजाचा संकेत आहे. विक्रांत बोटीच्या पुनरागमनाचे जाहीर होत असलेले तपशील हे जितके लष्करी दृष्ट्या महत्त्वाचे आहेत, तितकेच आणि तेवढेच ते व्यावसायिक दृष्ट्याही आश्वासक आहेत. ब्राम्होसही त्याच रांगेत आहे. 'लष्करी आयातीत अग्रगण्य देश होण्यात आम्हांला स्वारस्य नाही' हे माननीय पंतप्रधानांनी अलीकडेच केलेले विधान हाच भारतीय नौदलाच्या नव्या ध्वजाचा खरा संकेत आहे.

एकंदरीतच भारतीय नौदलाच्या नवीन ध्वजातून दिले जाणारे विविध संकेत हे सकारात्मक दृष्ट्या 'कही पे निगाहे, कही पे निशाना . .. .! !! !'

**– चन्द्रशेखर टिळक**
सी–४०२, राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ, राजाजी पथ,
डोंबिवली (पूर्व), पिन – ४२१२०१
भ्रमणध्वनी – ९८२०२९२३७६

●●●

# स्त्रियांचे मूलभूत अधिकार : न्यायिक सक्रियता

*संविधानाने स्त्रियांना दिलेले हक्क व अधिकार याबाबत लेखकाने आपले विचार या लेखात विशद केले आहेत. – संपादक*

स्त्रिया हा समाजाचा निम्मा भाग असला तरी तो भाग शोषीत वर्ग म्हणून मानला गेला आहे. धर्मशास्त्र ते समाज शास्त्र, राज्यशास्त्र अशा सगळ्यांनीच स्त्रियांच्या वाटी काय पेरून ठेवले आहे याची सर्वांनाच कल्पना आहे. संतांपासून समाज सुधारकांपर्यंत प्रत्येकानेच आपआपल्या परिने समाजामध्ये स्त्रियांच्या अधिकारां-विषयी जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सामाजिक परिवर्तन सहजासहजी घडत नाही. राजा राममोहन रॉय यांना सती प्रथेविरोधात आंदोलन केले म्हणून विरोध पत्कारावा लागलाच. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. आंबेडकर यांनीही विरोधाचा अनुभव घेतलेला आहे. पण तो काळ संविधान येण्यापूर्वीचा होता. आज संविधान असताना, संविधानाने स्त्रियांना त्यांचे हक्क, अधिकार प्रदान केल्यानंतरही जर अजुनही जागृतीची गरज असेल तर ही मोठी शोकांतिका आहे.

भारतीय राज्यघटना नागरिकांच्या आणि व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी पूर्णपणे सुसज्ज आहे. राज्यघटनेतील काही तरतुदींमुळे विधिमंडळ आणि न्यायव्यवस्था अधिक संरक्षणात्मक आणि सावध झाली आहे, विशेषत: महिला आणि बालकांच्या हक्कांबद्दल. राज्यघटनेतील अनुच्छेद १५ (३) महिला आणि बालकांसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार राज्याला देते. या तरतुदीतील अधिकारांचा वापर करून, राज्याने पारंपरिक अन्यायांपासून (जसे की हुंडा, बालविवाह, पुनर्विवाह बंदी, वडिलोपार्जित संपत्तीचे समान हक्क, घरगुती हिंसाचार इ.) पासून स्त्रियांचे संरक्षण करण्यासाठी अनेक कायदे पारित केले आहेत. या तरतुदी स्त्रियांना त्यांच्या जीवनाच्या सर्व क्षेत्रात प्रगत आणि स्वावलंबी बनवतात. न्यायपालिकेने अनेक प्रकरणांमध्ये न्यायिक सक्रियतेचा (Judicial-ctivism) परिचय देऊन विधीमंडळाने दुर्लक्षित केलेले महिला व बालक हिताचे अनेक निर्णय देऊन संविधानाला अपेक्षित जीवन देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या लेखाचा उद्देश स्त्रियांशी संबंधित कायद्यांचा सकारात्मक अर्थ लावण्यात आणि त्यांच्या बाजूने नवीन अधिकार निर्माण करण्यात न्यायव्यवस्थेच्या योगदानाची माहिती देणे आहे. महिलांच्या सन्माननीय जीवनावर अधिक सकारात्मक परिणाम पाहण्यासाठी महिलांशी संबंधित कायद्यांच्या चांगल्या अंमलबजावणीसाठी काही सूचना देखील प्रस्तावित आहेत.

महिलांना समान न्याय न देणाऱ्या कायद्यांच्या विरोधात निकाल देण्यासाठी भारतीय न्यायव्यवस्थेला अनेक प्रकरणांमध्ये काम करावे लागले आहे. उदाहरणार्थ, समान काम आणि समान वेतन किंवा समान सुरक्षा, वगैरे. त्याची सविस्तर चर्चा पुढे येईलच. त्यामुळे न्यायव्यवस्थेला जेव्हा केव्हा संधी मिळते तेव्हा न्यायव्यवस्था विधिमंडळाने किंवा प्रशासनाने केलेल्या कायद्यांचा अर्थ लावून, त्या कायद्यांचा अर्थ सकारात्मकतेने समजून घेऊन स्त्रियांच्या हिताचे नवे हक्क निर्माण करते. तिहेरी तलाक असंवैधानिक घोषित करणे असो किंवा कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण करणे असो, न्यायव्यवस्थेने नेहमीच महिलांचे जीवन संविधानारूप अर्थपूर्ण केले आहे. पण राज्याचा दुसरा भाग म्हणजे प्रशासन (Executive)

महिलांच्या हक्कांच्या रक्षणासाठी फारशी आस्था आणि गांभीर्य दाखवत नाही. प्रशासनाच्या या निष्क्रियतेमुळे न्यायव्यवस्थेच्या निर्णयाला म्हणावे तसे यश मिळत नाही.

**न्यायिक सक्रियता (Judicial -ctivism)**

न्यायिक सक्रियता हे व्यक्तींचे मूलभूत हक्क आणि मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी न्यायपालिकेने विकसित केलेले एक साधन आहे. मात्र, अनेक विद्वानांनी यास 'न्यायिक अतिरेकवाद' (Judicial Excessivism) म्हणून टीका देखील केली आहे. 'सत्तेचे विभाजन' (Seperation of Power) या सिद्धांतामध्ये निर्धारित मर्यादा ओलांडणे हा 'न्यायिक अतिरेकवाद' असू शकतो, परंतु दिलेल्या मर्यादेत राहून संविधानास अपेक्षित असा कायद्याचा अर्थ महिलांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यास न्यायिक सक्रियता म्हणता येऊ शकेल.

माननीय सर्वोच्च न्यायालयाने कॉमन कॉज (रजि. संस्था) विरुद्ध भारत सरकार (२००३) या ऐतिहासिक निकालात न्यायिक सक्रियता आणि न्यायिक अतिरेक याची चर्चा केली आहे. न्यायिक सक्रियता जहाल आणि कायदेशीर असू शकते असे न्यायालयाचे म्हणणे आहे. राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ व २१ प्रमाणे न्यायालयाने न्यायिक सक्रियतेचा सिद्धांत वापरून अनेक नवनवीन अधिकार निर्माण केले आहेत. न्यायिक अतिरेकवाद स्पष्ट करताना न्यायलयानी हे स्पष्ट केले आहे की, काही वेळा न्यायालये कायदेमंडळ किंवा प्रशासन संबंधित कार्ये करण्यासाठी न्यायालयीन कार्याची मर्यादा ओलांडतात. अस्तित्वात असलेल्या कायद्याला अनुसरून त्याच्या अर्थबोधनाचे काम न्यायालये करत असतील तर चांगलीच बाब आहे; पण न्यायमूर्तींनी न्यायालयीन निर्णयाच्या माध्यमातून नवीन कायदे तयार करू नयेत. न्यायिक सक्रियतेचा सिद्धांत वापरूनच भारतीय न्यायव्यवस्थेने अनेक निवाडे दिले आहेत आणि विधिमंडळाच्या कायद्याचा योग्य अर्थ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. देशांतर्गत कायदे किंवा आंतरराष्ट्रीय कायद्यांद्वारे आधीच ठरवलेल्या अधिकारांची पुनर्व्याख्या केली आहे. न्यायिक सक्रीयतेने न्यायव्यवस्था समाजाप्रती अधिक जबाबदार तर बनलीच, पण राज्याच्या इतर अवयवांनाही संविधानाच्या आदेशानुसार काम करण्यास भाग पाडले आहे.

संविधानाच्या भाग तीन मध्ये भारतीय नागरिकांसाठी मूलभूत अधिकार प्रदान केलेले आहेत. विशेषत: महिलांसाठी काही विशेष अधिकार निर्माण केले आहेत. अनुच्छेद १५ (३) राज्याला महिलांसाठी विशेष तरतुदी करण्यास सक्षम करते. अनुच्छेद १५ (३) महिलांच्या बाजूने सकारात्मक भेदभाव करण्याचा, महिला आणि बालकांची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांना समानता प्रदान करण्यासाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार राज्याला प्रदान करते. अशा कायद्याला न्यायालयात आव्हान देण्याचा अधिकार नागरिकांना देण्यात आला आहे. समानता नाकारणारे अनेक कायदे, प्रशासकीय धोरणे आणि नियमही न्यायालयांनी अनेक प्रसंगी चुकीचे आणि घटनाबाह्य ठरवलेले आहेत.

एअर इंडिया विरुद्ध नर्गिश मिर्झा, (१९८१) या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने असे नमूद केले की, महिलांना केवळ महिला असल्याच्या आधारावर नोकरी नाकारली जाणार नाही, असे करणे संविधानाने दिलेल्या अधिकारांचे उल्लंघन करते. या प्रकरणात याचिकाकर्त्याने त्या सेवा नियमाला आव्हान दिले होते ज्यामध्ये एअर होस्टेसची नोकरी मिळाल्यानंतर किमान चार वर्षे लग्न न करू शकणे आणि लग्नानंतर लगेचच गरोदर न राहण्याचा नियम करण्यात आला होता. हा नियम न्यायालयाने भारतीय महिलांसाठी अनैतिक, घृणास्पद, क्रूर, अन्यायकारक, असंवैधानिक आणि स्त्रियांचा अनादर करणारा म्हणून घोषित केला होता.

महाविद्यालये आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी राखीव जागांचा मुद्दा मुंबई उच्च न्यायालयाने घटनात्मकदृष्ट्या वैध असल्याचे घोषित केले होते. भारतीय फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७ नुसार, स्त्रिया, मुले आणि आजारी किंवा अशक्त व्यक्तीची कायदेशीर कोठडीतून सुटका केली जाते. कारण ही तरतूद घटनेच्या अनुच्छेद १५ (३) अंतर्गत करण्यात आली आहे.

**समान काम – समान वेतन**

समान कामासाठी समान वेतन हा राज्यघटनेत मूलभूत अधिकार म्हणून घोषित केलेला नसला तरी सर्वोच्च न्यायालयाने यास मूलभूत अधिकार घोषित केले आहे. रणधीर सिंग वि. युनियन ऑफ इंडिया (१९८२) या प्रकरणात न्यायालयाने भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३९ (ड) आणि अनुच्छेद १४, १६ नुसार समान कामासाठी समान वेतनाचे तत्त्व स्विकारले आणि हे तत्त्व संविधानाच्या प्रस्तावनेमध्ये अंतर्भूत असल्याचे सांगितले.

**महिलांचा विनयभंग**

सर्व वयोगटातील महिलांचा सार्वजनिक ठिकाणी छळ केला जातो, त्यामुळे काही गंभीर शारीरिक आणि मानसिक समस्या उद्भवतात. त्यामुळे अनेक महिला आत्महत्या करतात. अशा प्रकारे एखाद्याचे जीवन संपवणे हे घटनेच्या कलम २१ नुसार शांततापूर्ण जीवन जगण्याच्या अधिकाराचे उल्लंघन असल्याचे संविधानाने घोषित केले आहे. अगोदर इव्ह टिजींग किंवा छेडछाड हा इतका गंभीर गुन्हा मानला जात नव्हता, परंतु पोलिस उपमहानिरीक्षक वि. एस. समुथीराम (२०१३) या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने अनुच्छेद १४, १५ आणि २१ अंतर्गत मूलभूत अधिकारांचे उल्लंघन मानून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे सुचवले होते.

**आईला 'नैसर्गिक पालक' घोषित करणे**

गीता हरिहरन वि. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (१९९९) या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने आईस देखील 'नैसर्गिक पालक' घोषीत केले. हिंदू कायद्याप्रमाणे बालकांच्या वयवर्ष ६ पर्यंतच आईस नैसर्गिक पालक मानले गेले आहे. परंतु वरील न्यायालयीन प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने असे मत मांडले की, कायद्याप्रमाणे फक्त वडिलांनाच नैसर्गिक पालक मानले जाते, परंतु वडील असा दावा करू शकत नाहीत की, ते एकटेच नैसर्गिक पालक आहे ते आणि त्याची पत्नी त्याच्या परवानगीशिवाय काहीही करू शकत नाही. अर्थात मुलाच्या भवितव्याचा निर्णय दोघांनी सहमतीने घ्यायला हवा असा सल्ला देखील न्यायालयाने दिला आहे.

**महिलांना अधिक संरक्षण देण्यासाठी न्यायालयाची मार्गदर्शक तत्त्वे आणि निर्देश :**

सर्वोच्च न्यायालयाने आपली न्यायिक सक्रियता वापरून महिलांना अधिकाधिक संरक्षण देण्यासाठी वेळोवेळी वेगवेगळी मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत. अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय कायदे आणि राज्यघटनेने दिलेल्या अधिकारांची व्याख्या करून न्यायालयाने महिलांचे हक्क सार्थक केले आहेत. न्यायव्यवस्थेच्या अशा सक्रियतेने खरे तर महिलांचे जीवन अधिक अर्थपूर्ण आणि संरक्षणात्मक बनवले आहे. संसदेने 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, प्रतिबंध आणि निवारण) कायदा, २०१३' लागू केला. खरंतर १९९७ मध्येच विशाखा विरुद्ध राजस्थान राज्य या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने महिलांना कामाच्या ठिकाणी लैंगिक छळापासून संरक्षण देण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे पारीत केली होती. न्यायालयाने पारीत केलेली मार्गदर्शक तत्त्वे ही न्यायिक सक्रियता आणि समाजातील महिलांप्रती न्यायालयीन संवेदनशीलतेचे ऐतिहासिक उदाहरण आहे. या निकालात, सर्वोच्च न्यायालयाने लैंगिक छळाची

व्याख्या स्पष्ट केली आणि राज्यांना एक संरक्षणात्मक यंत्रणा सुरू करण्याची सूचना केली होती. संसदेला या विषयावर कायदा करण्यासाठी जवळपास १६ वर्षं लागली हे विशेष. त्याचप्रमाणे गौरव जैन विरुद्ध भारत सरकार (१९९७) या प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयाने वेश्या आणि त्यांच्या मुलांची दुर्दशा सुधारण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. राज्यशासनाने कशाप्रकारे त्यांची काळजी घ्यावी व त्यांच्या मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा याची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.

**न्यायिक सक्रियता आणि प्रशासकीय निष्क्रियता**

भारतीय संविधान, विविध देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांद्वारे महिलांचे मानवी हक्क सुनिश्चित केले जातात, हे न्यायिक सक्रियतेद्वारे अधिक स्पष्ट केले जाऊ शकते, परंतु प्रशासकिय निष्क्रियता महिलांना त्यांचे मानवी हक्क आणि मूलभूत अधिकारांचा उपभोग घेण्यापासून प्रतिबंधित करते. भारतात दर तासाला महिलांविरुद्ध विविध प्रकारचे ३९ गुन्हे नोंदवले जातात. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (NCRB) च्या अहवालानुसार, महिलांविरुद्धचे गुन्हे खूप जास्त आहेत आणि महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये दोषी ठरण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. न्यायिक सक्रियतेतून कितीही मार्गदर्शक तत्त्वे पार पाडली तरी, प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे महिलांविरोधातील गुन्हे म्हणाव्या त्या गतीने रोखले जात नाही. महिलांवरील ॲसिड हल्ल्याला रोखण्यासाठी जेव्हा पोलिस प्रशासनला अपयश आले होते तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने काही मार्गदर्शक तत्त्वे पारित केले होते. यामध्ये ॲसिड विक्रीवर लक्ष ठेवले जावे, त्याची नोंद ठेवली जावी, ओळखपत्राशिवाय ॲसिड विकले जाऊ नये, खरेदी करण्याचे कारण लिहून घ्यावे असे सूचनेचे काही भाग होते. या निर्णयानंतर नक्कीच ॲसिड हल्ले कमी झाले, परंतु पूर्णपणे थांबले नाहीत हेही खरेच.

सर्वोच्च न्यायालयाने पारीत केलेले विविध निवाडे, निर्देश आणि मार्गदर्शक तत्त्वे तेव्हाच फलदायी ठरू शकतात जेव्हा कार्यकारी मंडळ, विशेषत: पोलिस प्रशासन आणि कनिष्ठ न्यायालयांनी घटनात्मक, मानवी भावनेने महिलांच्या अधिकारांचे संरक्षण केले पाहिजे. कमी शिक्षा दर आणि महिलांविरुद्ध वाढणारे गुन्हे महिलांच्या मानवाधिकारांचे उल्लंघन करतात आणि गुन्हेगारांना बेकायदेशीर शक्ती आणि धैर्य देखील देतात. त्यामुळे, कार्यकारी मंडळाने आपल्या कर्तव्यापासून दूर न जाता सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे आपले काम अत्यंत प्रामाणिकपणे केले पाहिजे. प्रशासकीय कर्तव्यात कसूर करणाऱ्यांवर कायद्याने कडक कारवाई झाली पाहिजे. प्रशासन कधी कधी किती निष्ठुरतेने वागते हे उत्तरप्रदेशमधील हाथरस कांडावरून दिसून येते. महिलांवर घरामध्ये आणि घराबाहेर अन्याय होत असल्याने अशा संस्था निर्माण करण्याची गरज आहे, जी वेळोवेळी यावर लक्ष ठेवेल. महिलांवर गुन्हा होण्याची चाहूल लागतात त्यास वेळेपूर्वी प्रतिबंध करता येईल अशी यंत्रणा निर्माण होणेही गरजेचे आहे. दोषी व्यक्तीच्या मनात कायद्याचा धाक निर्माण झाला तर महिलांच्या जीवनात थोडासा बदल होऊ शकतो. गुन्हा करणाऱ्यांनाही लवकरात लवकर शिक्षा व्हावी, हेही प्रशासनाने पाहिले पाहिजे. खटल्यातील दिरंगाई गुन्हा करण्याची भीती कमी करते हे लक्षात ठेवले पाहिजे. प्रशासनाने समाजातील सर्व घटकांना सक्त संदेश देण्याची गरज आहे की ते महिलांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन खपवून घेणार नाहीत. परंतु हा संदेश मौखिक नाही, तर कृतीतून दिसायला हवा.

**– प्रा. विनोद एच वाघ**
सहाय्यक प्राध्यापक
विप्रमंचे टीएमसी विधी महाविद्यालय, ठाणे

●●●

# अवचिता परिमळू । झुळकला आळूमाळू

*ज्ञानेश्वरांच्या एका प्रसिद्ध अभंगावर ज्येष्ठ समीक्षक डॉ आनंद कुलकर्णी यांनी लिहिलेला लेख - संपादक*

सहज फेरफटका मारायचा म्हणून टेरेसवर आलो, तर वाहत्या वाऱ्यासोबत भरभरून सुगंध आला. बघतो तर काय, समोर जुई पूर्ण फुललेली ! मातीतून उगवणारं नक्षत्र म्हणजे दुसरं काय असतं? नाजूक, शुभ्र, सुगंधी जुई! निसर्ग अमाप अमूल्य गोष्टी देत असतो. त्यापैकी फुलांचा सुगंध अशीच एक अमूल्य देणगी. सुगंध नैसर्गिक असतो आणि निसर्गातच असतो. माणसांना सुगंध नसतोच, असते ती असह्य दुर्गंधी. ही दुर्गंधी घालवायला माणसाने अत्तर हा पर्याय शोधला. पण तो प्रक्रिया केलेला सुगंध. भेसळ सुगंध! त्यामुळे नाकाला आल्हाद देणारा वास येईल, मनाला फुलवणारा सुगंध नाही. तो फुलांत असतो, अत्तराच्या कुपीत नाही.

मला हा जुईचा सुगंध आल्याबरोबर काय आठवलं सांगू? 'अवचिता परिमळू। झुळुकला आळूमाळू' ही ज्ञानेश्वरांची नितांत सुंदर ओळ! अवचित/अचानक येणारा सुगंध. आणि त्याची यायची रीत कशी? मंद, अधूनमधून येणारी झुळूक. ज्याला सुगंध येतो आणि जो स्वतःच सुगंध आहे अशा कमाल प्रतिभावंताने शब्दांत ओतलेला हा भाव आहे. प्रतिभावंताच्या हाती शब्द कसे जादूई होतात ना! 'झुळुकला' हा शब्द बघा. हा शब्द वापरून ज्ञानेश्वर सुगंधाचा हळुवारपणा आणि उत्कटता दोन्हीही व्यक्त करतात. सुगंध फवारायचा नसतो, त्याची मंद झुळूक द्यायची असते. सुगंध आत खोलवर गेला पाहिजे, श्वासात भरून राहिला पाहिजे, रंध्रात मिसळला पाहिजे. म्हणून तो एकदाच, खूप नको, अनेकवार मंदपणे यायला हवा. जणू सुगंधाचं लयबद्ध आवर्तन! ते जेवढं मंद, तेवढा मनावर होणारा परिणाम तीव्र आणि खोल. ज्ञानेश्वर शब्द आणि भाव इतके बेमालूम मिसळून देतात की, एरव्ही प्रत्यक्ष सुगंध नसेल तरी सुगंधाची अनुभूती येते. ज्ञानेश्वर शब्दांना अनुभवाचं परिमाण देतात. त्यांचे शब्द नुसती रसाळपणाची शोभा आणत नाहीत, सुगंधाची अविनाशी झुळूक आणतात. बहुतेक 'अतिंद्रिये परि भोगवीन इंद्रियाकरवी' ह्या त्यांच्या प्रतिज्ञेचा हाच अर्थ असावा. इंद्रिया पलीकडच्या सुगंधाला इंद्रियापर्यंत आणण्याची ही किमया ज्ञानेश्वर साधतात. बरं, सुगंधाची ही लयलूट नाकापर्यंतच थांबत नाही, ती मनात उतरते. 'मी म्हणे गोपाळू आला गे माये' इथपर्यंत ही झुळूक विशाल होत जाते. सुगंधाची मंद झुळूक म्हणजे गोपाळाच्या येण्याची वर्दी तर नाही ना? गोपाळ येईल तर कसा येईल? अवचित येईल, सुगंधासारखा मंद चालीत येईल आणि अधूनमधून येत राहील. बापरे! हा विचार माझ्या मनात आला मात्र आणि अंगावर सर्रकन काटा आला. सुगंध ही गोपाळाच्या येण्याची सूचना वाटते ज्ञानेश्वरांना.

गोपाळ म्हणजे नखशिखांत सुगंध आणि तो येईल तर सुगंधाचा दरवळ होणारच. गोपाळ म्हणजे विठ्ठल आणि ज्ञानेश्वरांनी सुगंध आणि विठ्ठलाचं काय नातं जोडलंय बघा. 'आला गे माये' हे किती लोभस शब्द आहेत. ओतप्रोत जिव्हाळा! खूप काळ आईला अंतरलेल्या लेकराची ओढ त्यात आहे. सुगंध आला म्हणजे विठ्ठल आला. एवढा काळ ज्याची आतुरतेने

(पृष्ठ क्र. २९ वर)

# फ्रीडम फ्रॅक्चर कोण करतो आहे...

*श्री. प्रमोद बापट यांनी 'फ्रॅक्चरड फ्रीडम' या पुस्तकासंदर्भात अत्यंत महत्त्वपूर्ण लेख लिहिला आहे - संपादक*

विमानतळ. बरीच गर्दी. वेगवेगळ्या विमान कंपन्यांचे ठेले. प्रवासी रांगांतून सरकताहेत. प्रत्येकाच्या हातात फडफडणारी कागदपत्रं. ठेल्यासमोर आल्यावर वजनकाट्यावर चढणारे डाग. वजनाचे हिशेबठिशेब होऊन प्रवासी पुढे नव्या रांगेकडे सरकतात. सुरक्षा तपासणी नाक्यावरही 'ही' गर्दी. हातातलं, खिशातलं सामान कट्ट्यावर चौकोनी थाळ्यांत ठेवून ते पुढे धावत्या पट्ट्यावरून तपासणी यंत्रात अदृश्य होताहेत. रांगेतला एक एक प्रवासी सरकत कमानीपाशी उभा. आता एकेकाची तपासणी. तपासणी चौथऱ्यावरच्याची सुटका झाल्यावर हा कमानीतून पुढे चौथऱ्यावर. तपासपट्टी अंगभर, मागेपुढे, आपादमस्तक हुंगत फिरते. शिपायाचा रूक्ष कोरडा चेहरा तसाच्या तसा. स्थिरचित्रासारखा. केवळ डोळे भेदक. बुब्बुळं डावी-उजवीकडे नाही, पण समोर.. थेट आपल्या अंगाच्या दिशेने सरसावणारी...झोत टाकल्यासारखी. निर्विकार मुद्रेनेच सुटकेचा संकेत. आता तपास बोगद्याच्या तोंडाशी पुन्हा गर्दी. आपल्या सामानाचं दर्शन झाल्यावर सुटकेचा खरा.. पुरा आनंद.

तसा तो आपल्यासारखा अनेकांना. ते सारेच मागे.. पुढे..

विमानधक्क्याच्या दिशेने. धक्केही अनेक. दुतर्फा. सगळीकडेच बाकाबाकांवर वाट पाहणारे प्रवासी. कुठे घोषणा सुरू. कुठे पुढची दिंडी उघडते. पुन्हा रांगा. हातात प्रवेशिका. शिक्के घेत बोगदाशिडीतून प्रत्यक्ष विमानात प्रवेश. सुहास्यवदनांकडून स्वागत. आपआपल्या आसनाकडे चिंचोळ्या मार्गिकेतून सरकत सरकत येऊन ठेपणे. एखादाच असलेला सामानाचा डाग डोक्यावरच्या माळ्यावर ठेवल्यावर खरे निवांतपण. आता केवळ बसायचं आणि बसायचंच. बाकी विमान आणि सेवकवर्ग तेवढा हलता.

येथवर सर्वांचंच सर्ववेळी असंच होतं.

कधीतरी.. अगदी कधीतरीच पुढे काही वेगळं घडतं. अचानक वेगळ्या हालचाली दिसू लागतात. कुणी वेगळीच माणसं आत शिरतात. भाल्यासारख्या नजरेने मधून फिरू लागतात. त्यांना अपेक्षित आसनापाशी येतात. तिथल्या प्रवाशाचं सामान माळ्यावरून उतरवतात. उघडतात. बहुधा काही अनुचित.. अभद्र गवसतं. त्या प्रवाशाला आसनावरून उठवून विमानाच्या बाहेर काढलं जातं.

हे वेगळं असतं. अन्यथा तो आणि आपण सारखेच असतो. तळावर आल्यापासून विविध ठिकाणी तशाच रांगा लावून, तपासणीची दिव्ये पार करून तो आलेला असतो. पण म्हणून कोणी ग्राहक हक्कांचा गजर करीत त्याचं प्रवक्तेपण घेत नाही. 'त्याच्याकडे अनुचित, अभद्र काही होतं तर आधीच्या तपासणीतून पुढं का येऊ दिलं?' असली तोंडपाटीलकी करीत नाही. त्याला उतरवल्यामुळे 'लोकशाही-मूल्यांचा आलेख खाली उतरतोय' अशी हाळी कुणी मारीत नाही. असहिष्णुता वाढत नाही, लोकशाही धोक्यात येत नाही, संविधानाची पायमल्ली होत नाही. एवढेच काय; त्याला उतरवलंय म्हणून कुणी बाणेदारपणे पायउतार होत नाही. अशी घटना घडते आहे म्हणून कुणी विमानाच्या कप्तानाला 'तूही मांड सोडायला हवी' असा पेच टाकत नाही. झेंडा नाही, नारा नाही... काही म्हणता काही होत नाही.

असं का बरं?

कारण तिथे सुरक्षेचा हा हट्ट आपल्या सर्वांसाठी, सर्वांच्या सुरक्षेसाठी असतो. सुरक्षा यंत्रणेच्या पहिल्या फेरीतून सुटला म्हणून अमरपट्टा दिला जात नाही. पुढे दुसऱ्या.. तिसऱ्या.. जेव्हा कधी वेढ्यात अनिष्ट सापडेल तेव्हा ते हद्दपार केलं जातं.

सध्या महाराष्ट्रात साहित्यिकांच्या स्वातंत्र्याच्या, अधिकारांच्या आरोळ्या ठोकल्या जात आहेत. नक्षलवादी चळवळीतील एका लेखकाच्या तुरुंगातील आठवणींच्या पुस्तकाच्या अनुवादित पुस्तकाला पुरस्कार समितीने आधी घोषित केलेला पुरस्कार नंतर त्यातील अनिष्टे दाखवून देत आक्षेप घेतल्यामुळे शासनाने स्व-अधिकारात तो पुरस्कार नाकारला.

हे एवढंच घडलं. असंच घडलं.

खरं तर इथेही सुरक्षा-तत्त्वच कार्यरत आहे. समाजाची हिंसक, अमानुष तत्त्वज्ञानाच्या उदात्तीकरणातून सोडवणूकीचाच हा प्रयत्न आहे. समाज-मन मुक्त ठेवण्यासाठी हा आटापिटा आहे. निर्णय कटू वाटेल, पण तो समाजस्वास्थ्याच्या माधुर्यासाठी घेतला गेला आहे.

अशा प्रसंगी खरं तर अशा दक्षतेचं अभिनंदन करायला हवं. निग्रही निर्णयाची पाठराखण करायला हवी. पण काही समाजात विखाराची पेरणी करणाऱ्यांना हा दुष्काळ वाटू लागला आहे. अशा सर्व अनिष्ट-अभद्रसमर्थकांपासून समाजाने सावध रहायला हवं. कारण आजवर ते सारेच मोहक मुखवटे घालून आपल्या समाजात हिंडत होते. त्यामुळे त्यांच्या मुखवट्यांच्या मोहिनीतून सावरायला हवं आहे. त्या सर्वांना निश्चयाने नाकारायला हवं आहे.

ते बळ आपल्या सर्वांजवळ आहेच. ते प्रकट होवो. आणि हे अनिष्ट टळो.

**– प्रमोद वसंत बापट**
बोरीवली

•••

( पृष्ठ क्र. २७ वरून – **अवचिता परिमळू । झुळकला आळूमाळू** )

वाट पाहिली तो आला. प्रतिक्षेची परमावधी झालीय. मग अवचित विठ्ठल येतो आणि फलश्रुती होते. 'आला गे माये' या शब्दांमधे आतुरता आहे, ओढ आहे आणि समाधान आहे. सुगंध ज्ञानेश्वरांसाठी विठ्ठलाची अनुभूती आहे. ती 'जो जे वांच्छिल तो ते लाहो' अशी विश्वव्यापक होत जाते. विठ्ठल भेटायला आला तर असा भेद गळून पडतो आणि माणूस आकाशाइतका विशाल होतोच. पण हे प्रतिभावंत ज्ञानेश्वरांसाठी आहे. आपल्यासाठी सुगंध हा विठ्ठल आल्याची सूचना असणार नाही. त्यासाठी अनिवार जिव्हाळा लागतो. पण सुगंधामुळे निदान आपल्या 'आतला' संवेदनशील माणूस आपल्याला भेटला तरी खूप झालं! आपण 'मनाने सुंदर होणं' ही सुगंधाने आपल्याला दिलेली अविस्मरणीय भेट असेल!

**– डॉ. आनंद कुलकर्णी**
इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, वारुलवाडी, नारायणगाव
ता. जुन्नर, जि. पुणे- ४१०५०४

•••

दिशा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

### NSTSE २०२२ - २३ परीक्षेचा निकाल

विज्ञान विषयाच्या राष्ट्रीय स्तरावर घेण्यात येणाऱ्या NSTSE परीक्षेत उत्तम यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन! NSTSE परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणे -

| अ क्र | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | आंतरराष्ट्रीय क्रमांक | मिळवलेले यश |
|---|---|---|---|---|
| १ | कु.तेलंग राघवेंद्र राहुल | २री | ३३४८ | शाळेत प्रथम क्रमांक |
| २ | कु.कर्णिक सना सुशांत | २री | ३६०७ | शाळेत द्वितीय क्रमांक |
| ३ | कु.लोणे जेनिता जितेंद्र | २री | ३८९० | शाळेत तृतीय क्रमांक |
| ४ | कु.काळे मिहिका वैभव | ३री | ३३७ | शाळेत प्रथम क्रमांक |
| ५ | कु.बेलोसे स्वानंद स्वप्नील | ३री | ५१२ | शाळेत द्वितीय क्रमांक |
| ६ | कु.मोडक ओजस अद्वैत | ३री | ७८५ | शाळेत तृतीय क्रमांक |
| ७ | कु.झापकर विहान सचिन | ४थी | ६८९ | शाळेत प्रथम क्रमांक |
| ८ | कु.गोखले जुई निलेश | ४थी | २२५८ | शाळेत द्वितीय क्रमांक |
| ९ | कु.शिंदे मोहित समीर | ४थी | ३९१२ | शाळेत तृतीय क्रमांक |

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

मराठी कादंबरी - 'नव्या वाटा..नवा प्रवास' या विषयावर जोशी - बेडेकर महाविद्यालयात एक दिवसीय चर्चासत्र संपन्न.

मराठी संशोधन मंडळ, के. ग. जोशी कला आणि ना.गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), ठाणे- मराठी भाषा विभाग आणि के. एम. अग्रवाल महाविद्यालय, कल्याण - मराठी भाषा विभाग यांच्या संयुक्त 'मराठी कादंबरी - नव्या वाटा, नवा प्रवास' या विषयावर एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन महाविद्यालयातील कात्यायन सभागृहात नुकतेच करण्यात आले होते.

चर्चासत्र उद्घाटन प्रसंगी डॉ. प्रदीप कर्णिक, डॉ.नीतिन रिंढे, डॉ.नीतिन आरेकर, श्री.चंद्रकांत भोंजाळ, कवयित्री नीरजा, डॉ.महेश केळूसकर, प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, प्रा. मीनल सोहोनी, डॉ.शीतल पावसकर - भोसले, प्रा.वृषाली विनायक, डॉ. वैशाली जावळेकर, प्रा.राजश्री माने-जाधव, डॉ.विमुक्ता राजे, प्रा.मानसी जंगम, प्रा.रुपेश महाडिक, डॉ.संतोष राणे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य सुचित्रा नाईक यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, 'मराठी संशोधन मंडळा'सोबत अनेक कार्यक्रम आपण केले आहेत. सी.एच.एम महाविद्यालय, अग्रवाल महाविद्यालय ही सगळी मंडळी काहीतरी चांगले व्हावे, काहीतरी चांगलं विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावं या दिशेने कार्य करत आहेत. यासाठीच आपण एकत्र हा आजचा कार्यक्रम घेतला आहे. त्यातून संस्कार घडावेत. आज नीरजा इथे उपस्थित आहेत, मी सर्व

विद्यार्थ्यांना सांगते की, नीरजा आपल्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी आहेत. प्रा. मीनल सोहोनी माजी सहकारी आहेत. तुम्हाला योग्य दिशेने नेणारे कोणीतरी हवे त्यासाठी हे चर्चासत्र आपण आयोजित केलं आहे.

तत्त्वज्ञानाबाबत बोलायचे झाले तर तत्त्वज्ञान विषय सर्व समावेशक आहे. साहित्य असो, समाजकारण असो, राजकारण असो सगळीकडे तत्त्वज्ञान विषय आभाळासारखं सूक्ष्मपणे आणि सर्वसमावेशकपणे हे असतेच. त्यामुळे तत्त्वज्ञानाच्या परिप्रेक्षातून सगळे विषय हे योग्यच असतात आणि त्याची पुन्हा-पुन्हा समीक्षा होणे गरजेचे असते. आजच्या या तीन कादंबऱ्यांवरचे चर्चासत्र हे थोडेसे तत्त्वज्ञानाच्या दर्शनाकडे, दिशेने जाणार आहे.हे एक पहिलं पाऊल आहे. एक नवीन सुरुवात मी समजते. कथा आणि कथेचे महत्त्व समुपदेशक म्हणून मला विशेष भावतं. माझे कथा सांगणे हे एका प्रकारे काउन्सलिंगचाच एक भाग आहे. कादंबरी ही कशी समृद्ध करते हे पाहणे गरजेचे आहे.



चर्चासत्राचे 'प्रास्ताविक करताना प्रा.मीनल सोहोनी' (के.एम.अग्रवाल महाविद्यालय) यांनी सांगितले की, आजच्या चर्चासत्राचा विषय 'मराठी कादंबरी - नव्या वाटा..नवा प्रवास' तर यातील नव्या वाटा कोणत्या तर याचे उत्तर आजच्या तीन कादंबऱ्यांमध्ये आहे. चालून जुनी झालेली वाट नाकारून नवीन वाटा या कादंबऱ्यांतून निर्माण झाल्या आहेत व वाचकांनाही हा नवा प्रवास आहे.

चर्चासत्राचे 'बीजभाषण डॉ. नीतिन रिंढे (चेतना महाविद्यालय)' यांनी केले. त्यांनी एकूणच मराठी कादंबरीचा प्रवासपट सर्वांसमक्ष उलघडला. आधुनिक कादंबरी जरी आपण आधुनिक म्हणत असलो तरी त्याचे मूळ परंपरेत आहेत. कादंबरीत झालेला वास्तववादी प्रारूप आणि माणूस म्हणून जगताना भोवताल यातून कादंबरीची जडण-घडण, कादंबरीचा आधुनिक प्रवास, मूल्यव्यवस्था, व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तीवर होणारा अन्याय या सर्वातून ग्रामीण कादंबरी देशी बनली याचेही सविस्तर विवेचन त्यांनी यावेळी केले.

या चर्चासत्राच्या प्रथम सत्रात प्रा.वृषाली विनायक (सी.एच.एम महाविद्यालय) यांनी नीरजा यांच्या 'थिजलेल्या काळाचे अवशेष', तर डॉ.वैशाली जावळेकर (रुपारेल महाविद्यालय) यांनी डॉ.प्रदीप कर्णिक यांच्या 'क्रोधे उत्पाटिला बळे', तर प्रा.राजश्री माने-जाधव (जोशी- बेडेकर महाविद्यालय) यांनी डॉ.महेश केळुसकर यांच्या 'क्रमशः' या कादंबऱ्यांचे निबंध वाचन केले. या सत्राचे निरोप भाष्य डॉ. शीतल पावसकर - भोसले (सी.के.टी. महाविद्यालय) यांनी केले.

'चर्चासत्राच्या दुसऱ्या सत्रात' लेखक डॉ.प्रदीप कर्णिक, डॉ.महेश केळुसकर, लेखिका नीरजा यांची खुली मुलाखत घेण्यात आली, या मुलाखतीचे संयोजन प्रा.मीनल सोहोनी व डॉ.संतोष राणे यांनी अतिशय खुमासदार शैलीत केले. यावेळी उपस्थित प्राध्यापक, आणि विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तरे स्वरूपात या मान्यवरांसोबत संवाद साधला.

संपूर्ण चर्चासत्राचे समारोप भाष्य डॉ.नीतिन आरेकर (उपप्राचार्य, सी.एच.एम महाविद्यालय) यांनी केले. चर्चासत्रासाठी उपप्राचार्य प्रा.सुभाष शिंदे, डॉ.प्रियंवदा टोकेकर, डॉ.महेश पाटील, ग्रंथपाल प्रा.नारायण बारसे यांचे सहकार्य लाभले. डॉ. विमुक्ता राजे, प्रा.मानसी जंगम आणि BAMMC विद्यार्थी याचे विशेष सहकार्य लाभले.

या चर्चासत्रासाठी अनेक नामवंत महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.रुपेश महाडिक यांनी केले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

## बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय

४ मार्च २०२३ रोजी नीट (NEET) या स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी याबद्दल प्रोफेसर दवेकर यांनी मार्गदर्शन केले. या सत्राला १४० विद्यार्थ्यांनी आपली उपस्थिती नोंदवली

विद्यार्थी आणि शिक्षकांचे स्वास्थ्य तंदुरुस्त राहण्याच्या दृष्टीने १० मार्च २०२३ रोजी विद्यार्थ्यांकरता, तर १३ मार्च २०२३ रोजी शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांकरता बांदोडकर महाविद्यालय व अंबिका योग कुटीर, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने नेती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP 2020) व त्याचे आयोजन याबद्दल माहिती होण्याच्या दृष्टीने सर्व विभाग प्रमुखांची बैठक ६ मार्च आणि २५ मार्च २०२३ रोजी संपन्न झाल्या. नवीन शैक्षणिक धोरणानुसार महाविद्यालयात कोणत्या प्रकारचे नवीन अभ्यासक्रम सुरू करता येऊ शकतात, त्याकरता आवश्यक कोणती तयारी करावी लागेल याबाबत प्राचार्य डॉ मोझेस कोलेट आणि रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ अनिता गोस्वामी-गिरी यांनी मार्गदर्शन केले.

'माझी वसुंधरा' या घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन ठाणे महानगरपालिकेतर्फे करण्यात आले होते, या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा २५ मार्च २०२३ रोजी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात संपन्न झाला. यावेळी सौ. मानसी प्रधान आणि श्री. राजू जाधव, प्रदूषण नियंत्रण विभाग यांच्या हस्ते पारितोषिक वितरण सोहळा संपन्न झाला. या स्पर्धेत राज धुमाळे याला प्रथम पारितोषिक, अमोल चौगुले द्वितीय आणि प्रथमच मलिक याने तृतीया क्रमांक पटकावला.

२३ आणि २५ मार्च २०२३ रोजी "Career Counselling Skills" या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. उपप्राचार्य व माहिती आणि तंत्रज्ञान विभागाचे विभाग प्रमुख श्री. अभिजीत काळे यांनी एम्प्लॉयबिलिटी स्किल्स याबद्दल मार्गदर्शन केले.

**अभ्यास भेट**

३ मार्च २०२३ रोजी पर्यावरण शास्त्र विभागाच्या निष्णात अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी 'पर्यावरण दक्षता मंच' या सेवाभावी संस्थेला भेट दिली.

६ मार्च २०२३ रोजी पर्यावरण शास्त्र विभागाच्या निष्णात अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी यू एस दूतावास, दोस्ती हाऊस या कार्यालयाला भेट दिली. या दूतावास कार्यालयातर्फे यावेळी 'द स्टोरी ऑफ प्लास्टिक' या विषयावर एक चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले होते. याबरोबरच चित्रपट निर्मात्या देईया स्चलोसबर्ग यांच्याबरोबर विद्यार्थ्यांनी संवाद साधला.

१० मार्च २०२३ रोजी पर्यावरण शास्त्र निष्णात अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी खारफुटी उद्यान, गोदरेज, विक्रोळी येथे भेट दिली.

११ मार्च २०२३ रोजी वनस्पतीशास्त्र विभागाच्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी ओरिएंटल इन्स्टिट्यूट ठाणे येथे भेट दिली.

पर्यावरण शास्त्र निष्णात अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी १६ मार्च २०२३ रोजी पवई तलाव येथे भेट दिली.

पर्यावरण शास्त्र आणि जैवविविधता व वन्यजीव व्यवस्थापन आणि संवर्धन निष्णात अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी नवी मुंबई येथील फ्लेमिंगो बर्ड सेंचुरी येथे २० मार्च २०२३ रोजी भेट दिली.

वैद्यकीय मानसशास्त्र (क्लीनिकल सायकॉलॉजी) निष्णात अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी २० मार्च २०२३ रोजी ठाणे मनोरुग्णालय येथे भेट दिली.

### ई-वेस्ट कलेक्शन ड्राईव्ह

४ मार्च २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना आणि पर्यावरण शास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी मिळून ई-वेस्ट कलेक्शन ड्राईव्ह आयोजित केली होती. या मोहिमेमार्फत २०० किलोहुन अधिक इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा कचरा त्यांनी जमा केला व इ-कारनेशन या संस्थेला पुढील प्रक्रियेकरता सुपूर्त केला.

### जागतिक महिला दिन

८ मार्च २०२३ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून १०२ विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर महिलांचा त्यांनी केलेल्या विशेष कामगिरीबद्दल पदक प्रदान करून सत्कार करण्यात आला होता.

### रसायनशास्त्र विभाग

रसायनशास्त्र विभागातर्फे डॉ वा. ना. बेडेकर व्याख्यानमालेचे आयोजन ९ मार्च २०२३ रोजी करण्यात आले होते. 'माझे राष्ट्र, माझे करिअर' या विषयावर डॉ. परशुराम यादव यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

रसायनशास्त्र विभागाचा किमोफिलिक महोत्सव ९ मार्च २०२३ रोजी संपन्न झाला, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांचे आयोजन केले होते.

### अनुबंध माजी विद्यार्थी संघटना

या माजी विद्यार्थी संघटनेतर्फे मे ची वार्षिक सर्वसाधारण सभा ४ मार्च २०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती.

अनुबंध माजी विद्यार्थी संघटनेतर्फे 'करिअर अपॉर्च्युनिटी इन डेटा सायन्स' या विषयावर २० मार्च २०२३ रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. श्री अरविंद कुमार आणि श्री अरुण प्रताप सिंग यांनी डेटा सायन्स या क्षेत्रातील विविध नोकरीच्या संधी, त्याकरता लागणारी कौशल्य याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



### ग्रंथालय विभाग

ग्रंथालय विभागातर्फे २३ मार्च २०२३ रोजी Book Mark Competition ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये २३ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी अतिशय कलात्मकरित्या विघटनशील पदार्थ वापरून बुक मार्क बनवले होते. या स्पर्धेत प्रथम वर्ष विज्ञान शाखेतील कु तन्वी येरम हिला प्रथम पारितोषिक, अकरावी इयत्तेतील कु रागिणी भोसलेला द्वितीय पारितोषिक तर कु रेणुका गलांडे हिला तृतीय पारितोषिक प्राप्त झाले. प्रथम वर्ष विज्ञान शाखेतील कु करीमा मंडल आणि कु निकिता अढलगे यांना उत्तेजनार्थ पारितोषिके प्राप्त झाली.



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या २०२०-२०२१ शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा पदवी वितरण सोहळा ५ मार्च २०२३ रोजी संपन्न झाला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मोझेस कोलेट सर आणि केंद्रसंयोजिका सौ कादंबरी मांजरेकर यांनी ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी अभ्यासक्रम व ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात अभ्यासक्रमाच्या उपस्थित विद्यार्थ्यांना पदवी वितरित केली.

ग्रंथालय विभागातर्फे १२ मार्च रोजी यशवंतराव चव्हाण जयंती आणि २३ मार्च रोजी 'शहीद दिवस' निमित्ताने मा यशवंतराव चव्हाण व भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या प्रतीमेला पुष्पहार अर्पण करून, तसेच त्यांच्यावरील माहितीचे प्रदर्शन व पुस्तक प्रदर्शन भरवून साजरा करण्यात आला.

## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### ६ मार्च विशेष व्याख्यान

दिनांक ६ मार्च रोजी महाविद्यालयातील प्राध्यापक श्रीमती रश्मी नाटेकर ह्यांनी प्रथम वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी व इंग्रजी व्याकरण ह्या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अनेक विद्यार्थ्यांनी आपली उपस्थिती दर्शवली व ह्या संधीचा पुरेपूर उपयोग करून घेतला.

### सत्र । पूर्वतयारी परीक्षा

खालील वेळापत्रकानुसार सत्र । पूर्वतयारी परीक्षा १,२,३ आणि ४ मार्च रोजी घेण्यात आली.

| तारीख | (विषय) | वेळ |
|---|---|---|
| 01/03/2023 | Legal Language & Legal Writing | सायंकाळी ५.०० ते ७.०० |
| 02/03/2023 | Law of Contract & Specific Relief | सायंकाळी ५.०० ते ७.०० |
| 03/03/2023 | Law of Tort Motor Accident Claims & Consumer Protection | सायंकाळी ५.०० ते ७.०० |
| 04/03/2023 | Labour Laws & Industrial Relation I | सायंकाळी ५.०० ते ७.०० |

### ८ मार्च महिला दिन

मूट कोर्ट हॉलमध्ये महिला दिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या सर्व महिला शिक्षिका आणि सहकारी महिला विद्यार्थ्यांचे स्वागत केले. श्री 'दयानंद केंद्रे ह्यांनी स्व-संरक्षण तंत्राविषयी माहिती दिली. सेल्फ डिफेन्सचे मूलभूत आणि सोपे तंत्र ज्या बाबत प्रत्येक महिलांनी जागरूक असणे आवश्यक आहे.

प्रा. हेतल मिश्री आणि प्रा. विनोद वाघ यांनीही महिला सशक्तीकरण विषयी सविस्तर माहिती दिली. 'काही सामाजिक प्रथा', ज्या अपमानास्पद आहेत त्याविषयीही त्यांनी भाष्य केले. ह्याविषयी काही गंभीर प्रश्न या दोघांनी उपस्थितांसमोर मांडल्याने प्रकाशझोतात आले. विशेष म्हणजे महिलांनी समाजकंटकांच्या विरोधात आवाज उठवला पाहिजे. कार्यक्रम खरोखरच डोळे 'उघडणारा' होता. सर्वांनी केवळ महिला दिनच साजरा केला नाही; तर समस्यांविरुद्ध आवाज उठवण्यासाठी प्रेरणा देखील घेतली.









### १३ आणि १७ मार्च एलएल एम आणि अतिरिक्त तुकडी – तक्रार सुनावणीमध्ये प्रतिनिधित्व सादर करणे

कॉलेजने एलएल एम आणि एलएल बी अतिरिक्त तुकडी ३ वर्षांसाठी संलग्नता वाढवण्यासाठी अर्ज केला होता. त्या प्रकरणी विद्यापीठाने तक्रारीची सुनावणी घेतली. आम्ही उपस्थित केलेल्या मुद्यांवर प्रतिनिधित्व सादर केले :

१. आम्ही दुसऱ्या सायकल NAAC साठी IIQA सबमिट केला आहे.

२. मुख्याध्यापक आणि ९ पूर्णवेळ शिक्षकांच्या भरतीसाठी सरकारी NOC प्रलंबित आहे

**प्रथम वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे परत करणे :**

प्रवेशादरम्यान गोळा केलेल्या एल.एल.बी.च्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे मूळ कागदपत्र १६,१७, १८ आणि २० मार्च २०२३ रोजी तुकडी प्रमाणे अ तुकडी पासून सुरुवात करून परत करण्यात आली त्याप्रमाणे रीतसर नोटीस लावून विद्यार्थ्यांना कळविण्यात आले होते.

ज्या विद्यार्थ्यांनी शेड्यूल चुकवले आहे त्यांना त्यांनी महाविद्यालयात भेट देऊन विनंती केल्यावर त्यांची मूळ कागदपत्रं परत करण्यात आली.

**२५ मार्च CDC/IQ-C**

दि. २५ मार्च रोजी सायंकाळी ०५:३० वाजता IQAC बैठक पार पडली. यामध्ये प्रभारी प्रा. श्रीविद्या जयकुमार व विशिष्ट अधिवक्ता श्री गजानन चव्हाण यांनी 'Google Meet' च्या माध्यमातून सहभाग घेतला. तर इतर सदस्य महाविद्यालयात हजर होते. सायंकाळी ०६:०० वाजता विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या उपस्थितीमध्ये CDC ची बैठक पार पडली. या वेळेस ॲड. आशिष गोगटे, श्रीमती माधवी नाईक उपस्थित होते व वरीष्ठ अभिवक्ता श्री राम आपटे व प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयकुमार ह्यांनी 'Google Meet' च्या माध्यमातून सहभाग घेतला.

**सत्र I च्या परीक्षा**

सत्र I च्या परीक्षा पुढील वेळापत्रकानुसार २८, ३१, मार्च आणि ३, ६ एप्रिल रोजी घेण्यात आल्या.

| तारीख | नियमित विद्यार्थी (विषय) | बाह्य विद्यार्थी (विषय) |
|---|---|---|
| 28/03/2023 | Labour Laws & Industrial Relation I | Labour & Industrial Laws |
| 31/03/2023 | Law of Tort Motor Accident Claims Consumer Protection | Law of Contract Specific Relief |
| 03/04/2023 | Law of Contract & Specific Relief | Law of Tort |
| 06/04/2023 | Legal Language | Legal Language |

**०३ एप्रिल रोजी २०० एलईडी ट्युब लाइटची भेट**

महाविद्यालयाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी २०० एलईडी ट्युब लाईट्स महाविद्यालयास भेट म्हणून दिल्या आहेत. दिनांक ३ एप्रिल २०२३ रोजी प्रा. विनोद एच वाघ, प्रा. हैतल मिशेरी, श्रीमती रंजन करंदीकर यावेळी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी 'पे बॅक टु कॉलेज' या उपक्रमासाठी स्वत:हून काही रक्कम जमा केली व त्यातुन २०० एलईडी ट्युब लाईट्सची भेट महाविद्यालयास दिली. यापूर्वी याच बॅचच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास संगणक भेट दिला होता. तसेच २०२१ च्या बॅचचे विद्यार्थी नीतिन बिडीकर यांनी प्रोजेक्टर भेट म्हणून दिला. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार यांनी या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करताना म्हटले आहे की, महाविद्यालयाचे आपण काही देणे लागतो ही भावना पुढील पिढीसाठी हितकारक आणि उत्साहवर्धक असते. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी या विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.



दान घेण्यात वाटणारे सुख हे क्षणिक असते; परंतु दान देण्याने जे सुख प्राप्त होते ते जीवनभर पुरत असते.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

१) Online practical workshop for the Applied Power Electronics Practical using MATLAB Software

६ मार्च ते २७ मार्च २०२३ रोजी महर्षी परशुराम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (MPCOE) शिक्षक वर्गाने विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्सच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी online पद्धतीने कार्यशाळेचे आयोजन केले. श्री. सतीश घोरपडे (इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख (MPCOE) व सौ. वैभवी मेहता (Assistant Professor MPCOE) यांनी कार्यशाळेचे मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांनी MPCOE सॉफ्टवेअरचे सर्किट जाणून घेऊन त्याचा आऊटपुटचे निरीक्षण करणे हा होता.

२) इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा व Paper presentation स्पर्धेत बक्षिसांचे मानकरी ठरले. सदर स्पर्धा तुलसीरामजी गायकवाड पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी, मोहागाव, नागपूर यांनी २५ मार्च २०२३ रोजी आयोजित केली. पेपर प्रेझेन्टेशन स्पर्धेत – "Night Patrol Robot using IOT" या शीषर्काच्या अंतर्गत खालील विद्यार्थी बक्षिसाचे मानकरी ठरले.

- मेहर झा (द्वितीय वर्ष इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स)
- गौरव जारड (द्वितीय वर्ष इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स)
- वेदांत झुंझारराव (द्वितीय वर्ष इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स)
- रचित जाधव (द्वितीय वर्ष इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स)

**राज्यस्तरीय टेक्निकल प्रश्नमंजूषा स्पर्धेत – प्रथम पारितोषिक**

- गौरव जारड (द्वितीय वर्ष इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स)

**द्वितीय पारितोषिक**

- तेजस धुरी ((तृतीय वर्ष इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स)

३) विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतन इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी विभाग व महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ५ दिवसीय FDP (Faculty development programme) चे आयोजन पाणिनी सभागृहात केले (१३ मार्च ते १७ मार्च २०२३)

"Innovation, Incubation & Startur Culture" या विषयांतर्गत आयोजित केलेल्या कार्यक्रमाला अनेक अनुभवी वक्त्यांचे मार्गदर्शन लाभले. सरदार पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी च्या Incubation सेंटरला भेट आयोजित केली होती. प्रोफेसर राव यांच्या मार्गदर्शनाने 'start up culture व त्यातील संधी' यावर उपस्थितांना मार्गदर्शन लाभले. महाराष्ट्रातून अनेक संस्थांतील शिक्षकांनी या ५ दिवसीय कार्यक्रमाचा लाभ घेतला. सदर कार्यक्रमात डॉ. उषा राघवन यांनी Programme Co-ordinator म्हणून कार्यभार स्वीकारला.

या प्रसंगी एक छोटी प्रभात फेरी काढण्यात आली होती. व्ही.पी.एम पॉलिटक्निक ठाणे येथे आज दिनांक २३ मार्च २०२३ रोजी सकाळी १२.३० वाजता आजादी का अमृत महोत्सव ७५ x ७५ x ७५ या कार्यक्रमा अंतर्गत ''आझाद हिंद ची गाथा'' या नाट्याचे प्रस्तुतीकरण करण्यात आले.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यासाठी महाराष्ट्रातील एक हजाराहून अधिक विद्यार्थी, कलाकार आणि नाट्यनिर्माते महाराष्ट्राच्या छत्तीस जिल्ह्यांत एकाच दिवशी ७५ महाविद्यालये, ७५ ठिकाणी, ७५ नाट्यप्रयोग सादर करत होती.

हा अनोखा प्रकल्प महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्यसंचालनालय, राष्ट्रीय सेवा योजना आणि आर्टिस्टिक ह्यूमन्स यांच्या संयुक्त विद्यमाने केला होता.

सदर नाटक करण्यासाठी ठाणे जिल्ह्यामधून व्ही. पी. एम. पॉलिटेक्निक ठाणे ची निवड झाली होती. या महाविद्यालयातील ५ विभागाच्या विद्यार्थ्यांनी सदर नाटकात सहभाग घेतला होता.

आपल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाचा सन्मान करण्याचा एक दिवस, भारताच्या प्रवासाची कहाणी आणि अमृत महोत्सवाची भावना साजरी करण्याची एक खरी संधी या कार्यक्रमामुळे मिळाली.

या एका नाटकापासून प्रेरित होऊन युवा विद्यार्थी पुन्हा आपल्या देदीप्यमान इतिहासाकडे वळतील याचा विश्वास नक्की वाटतो.

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागामध्ये देखील हे विद्यार्थी भविष्यात खूप चांगली कामगिरी करतील हे मात्र नक्की.

या मागची प्रेरणा, नियोजन, साधत असलेल्या समन्वय, ऑनलाईन रिहर्सल घेत असताना विद्यार्थ्यांना देत असलेले मोटिवेशन, हे सर्व भारावणारं होतं.

आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी याचा अतिशय उत्तम लाभ घेऊन उत्कृष्ट सादरीकरण केले. या बद्दल सर्व टिमचे मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन !!



सदर नाटकात सहभागी झालेल्या सर्व कलावंतांचे विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतनाचे प्राचार्य डॉ. डी. के. नायक यांनी विशेष कौतुक केले.

या सर्व कार्यक्रमाचे दिग्दर्शन आणि नियोजन इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख डॉ कीर्ती आगाशे यांनी प्राध्यापक सौ गौतमी पुजारे, सौ. पूजा जांभळे आणि सौ. सुगिनिमा एम. या आपल्या सहकारी प्राध्यापक वर्गाला घेऊन केले.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

२ मार्च: प्रा. कृष्णकांत लसुणे यांना चेतना कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्सच्या सहकार्याने आय सी एस एस आर (ICSSR) द्वारे आयोजित 'ऑनलाईन कपॅसिटी बिल्डिंग प्रोग्राम ऑन रिसर्च मेथडॉलॉजी' या कार्यक्रमासाठी व्याख्याता म्हणून आमंत्रित करण्यात आले.




७ मार्च : प्रा. संदीप मोघे यांनी 'डिजिटल युगातील नावीन्यपूर्ण अध्यापन धोरणे आणि साधने' या विषयावरील २१ दिवसांचा राष्ट्रीय स्तरावरील प्राध्यापक विकास कार्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला.

७ मार्च : विद्यालंकार इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी तर्फे आयोजित केलेल्या व्हॅनगार्ड केस स्टडी स्पर्धेसाठी डॉ. स्मिता जपे यांना परीक्षक म्हणून आमंत्रित करण्यात आले.



८ मार्च : महिला विकास समिती सदस्य डॉ. स्मिता जपे आणि डॉ. कांचन अक्षय यांनी आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले.




११ मार्च : सहा. प्रा प्रथमेश तावडे यांना ठाकूर कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्समधील बी.आय.एम.च्या कार्यक्रमासाठी अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणून आमंत्रित करण्यात आले.

११ मार्च : सहा. प्रा. प्रथमेश तावडे यांची ठाकूर कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स येथे बी.आय.एम. अभ्यासक्रमाच्या मुलाखत परीक्षेसाठी बाह्य परीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

१७ मार्च : डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी 'जाहिरात आणि डिजिटल मार्केटिंग' उद्योगात कार्यरत माजी विद्यार्थिनी अपूर्वा पोटे हिला उद्योगविषयक अनुभव कथन करण्यासाठी आमंत्रित केले आणि शैक्षणिक उपक्रमाचा एक भाग म्हणून IMC विषयासाठी एमएमएस च्या विद्यार्थ्यांसोबत एक डिजिटल मोहीम नियोजन करण्याची प्रत्यक्ष केस स्टडी सोडविण्याचा उपक्रम आयोजित केला.





२१ मार्च : तीन विद्यार्थ्यांच्या संघांनी बी.एम.ए. इनोथॉन ४.० मध्ये ब्रिम्सचे यशस्वीरीत्या प्रतिनिधित्व केले आणि त्यांनी सुचवलेल्या नावीन्यपूर्ण उपायांची उद्योजकांकडून देखील प्रशंसा केली गेली.

| संघ – १ | संघ – २ | संघ – ३ |
|---|---|---|
| ऐश्वर्या घाडी | लीना शेलार | रोहीन जोशी |
| हरिशंकर यादव | मानसी सावंत | सनिष्मा कुन्नथ |
| हृषिकेश खरे | निधी जैन | श्रद्धा रवळे |
| कादंबरी कावळे | मोहम्मद जैद वाघू | तन्वी कदम |
| मार्गदर्शक : प्रा.दीप्ती पेरीवाल | मार्गदर्शक : प्रा.विभूती सावे | मार्गदर्शक : प्रा.सिद्धेश सोमण |

२३ मार्च : डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी AICTE तर्फे आयोजित, क्रिएटिव्ह प्रॉब्लेम सॉल्व्हिंग अँड मिनींगफूल आर.अँड डी. व ओरिएंटेशन टूवर्ड्स टेक्निकल एजुकेशन अँड करिक्युलम आस्पेक्ट्स हे दोन्ही राष्ट्रीय तांत्रिक शिक्षक प्रशिक्षण उपक्रम उत्कृष्ट गुणांसह यशस्वीरीत्या पूर्ण केले.

२५ मार्च : ब्रिम्स चा संघ, बी.एम.ए. इनोथॉन ४.० (BMA Innothon ४.०) मध्ये पुन्हा एकदा झळकला !

BMA (बॉम्बे मॅनेजमेंट असोसिएशन) तर्फे नुकत्याच आयोजित झालेल्या इनोथॉन ४.० या व्यवस्थापन स्पर्धेत, विद्यार्थ्यांना मॅनेजमेंट हॅकाथॉनमध्ये एक वास्तविक व्यावसायिक आव्हान सोडवण्याचे काम देण्यात आले होते, ज्यासाठी त्यांना विविध नावीन्यपूर्ण आणि व्यवहार्य उपाय सुचवायचे होते. यामध्ये कॉर्पोरेट, कौटुंबिक व्यावसायिक आणि लघु-उद्योजक अशा सहभागी संस्थांनी व्यावसायिक समस्या मांडल्या.

एम.एम.एस. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या गटाने प्रभावी प्रदर्शन करून द्वितीय उपविजेतेपद पटकावले. या स्पर्धेत मुंबईतील अव्वल बी-स्कूलचे संघ, एसीसी - दांडेकर स्मृती चषकाचे हे प्रतिष्ठित पारितोषिक मिळवण्यासाठी झगडत होते.

विद्यार्थ्यांच्या संघात रोहीन जोशी, तन्वी कदम,

सनिष्मा कुन्नथ आणि श्रद्धा रवळे यांचा समावेश होता, या विद्यार्थ्यांना सहाय्यक प्राध्यापक सिद्धेश सोमण यांनी मार्गदर्शन केले. या सर्वांनी इनोथॉनमध्ये ब्रिम्सचे प्रतिनिधित्व केले आणि स्पर्धेच्या तयारीसाठी अनेक आठवडे मेहनत केली. त्यांनी संशोधन आणि सराव करण्यासाठी, कौशल्ये सुधारण्यासाठी आणि रणनीती तयार करण्यासाठी असंख्य तास समर्पित केले.

इतर बी-स्कूल मधून जबरदस्त स्पर्धेला तोंड द्यावे लागत असतानाही, संघाने त्यांच्या नावीन्यपूर्ण संकल्पना आणि परिणामकारक सादरीकरण कौशल्याने परीक्षकांना प्रभावित करण्यात यश मिळवले. त्यांनी विपणन, ऑपरेशन्स आणि वित्त (फायनान्स) या सह व्यवस्थापनाच्या विविध क्षेत्रांतील त्यांचे ज्ञान आणि कौशल्य प्रदर्शित केले.



२७ मार्च : प्रा. संदीप मोघे यांनी वि. प्र. मं. च्या के जी जोशी कला आणि एन जी बेडेकर वाणिज्य महाविद्यालयासाठी लर्निंग मॅनेजमेंट सिस्टम: "LMS - InPods" या विषयावर एक सत्र आयोजित करून मार्गदर्शन केले.

२८ मार्च : डॉ. नीतिन जोशी आणि डॉ. दिनेश सोनकुल यांनी संकल्प पब्लिकेशन्सने प्रकाशित केलेल्या काँटेंपररी रिसर्च इन कॉमर्स अँड मॅनेजमेंट ऑन ॲप्लिकेशन्स ऑफ इंटरनेट ऑफ थिंग्स (IoT) या पुस्तकातील एक प्रकरण संयुक्तपणे लिहिले.

२९ मार्च: ब्रिम्सच्या सी.एस.आर. समितीने स्वच्छता मोहीम राबवली.




३० मार्च: प्रा. कृष्णकांत लसुणे यांनी अल्मा बेटर या संस्थेचा 'पायथॉन बेसिक्स' हा अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला.


AlmaBetter

CERTIFICATE
OF APPRECIATION
PROUDLY PRESENTED TO

Krishnakant lasune

has successfully completed the Competency Challenge

Python Basics - I

Shivam Dutta
CEO & Co-Founder

३० मार्च: ब्रिम्सच्या सी.एस.आर समितीने सामाजिक क्षेत्रातील 'रोजगाराच्या संधी' या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित केले.




३० मार्च: डॉ. नीतिन जोशी यांनी प्रोडक्ट अँड ब्रँड मॅनेजमेंट या अभ्यासक्रमावरील प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी मुंबई विद्यापीठाला भेट दिली.

डॉ. वा.ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था - ग्रंथालयाची माहिती

ग्रंथालयामार्फत मार्च या महिन्यात एकूण १९ नवीन पुस्तके घेण्यात आली. तसेच सदस्यत्व असलेल्या

नियतकालिकांमधील ७२ लेखांचे 'कोहा' या ग्रंथालय प्रणाली मध्ये तालिकीकरण करण्यात आलेले आहे. हे सर्व लेख ग्रंथालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सर्व नियतकालिके आणि माहितीसंग्रह हे ग्रंथालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. opac.vpmthane.org: 50400

मार्च या महिन्यामध्ये सेवकवर्ग आणि विद्यार्थी यांनी मिळून २०६१ पुस्तकांची देवाणघेवाण केली त्यामध्ये –

१) देवघेव केलेली पुस्तके : ७०८

२) नूतनीकरण केलेली पुस्तके : १००७

३) परत आलेली पुस्तके : २७८


सर्वोत्कृष्ट ग्रंथालय वापरकर्ता :

मार्च २०२३ मध्ये सर्वाधिक पुस्तके घेणारे सभासद


१) प्राध्यापक : सौ. जान्हवी पोतदार – ३२ वेळा


२) विद्यार्थी : (अ) अर्निडॉल पार्थसारथी सेनगुप्ता आणि (ब) प्रणोती संजय सपकाळ – १५ वेळा – वशिष्ठ बॅच

- निम्ब्स या प्रणालीचा वापर करून EBSCO eBooks या माहिती संग्रहाचा विषयानुसार केलेला वापर





- प्रकाशकांनुसार व विषयांनुसार मोबाईल अँपच्या माध्यमातून केलेला वापर




- m-Library मोबाईल अँप चा जास्तीतजास्त वापर करणारे




•••

**दिशा संपर्क दूरध्वनी**

**०२२-२५४२ ६२७०**

प्रेम करणे ही एक कला आहे. परंतु प्रेम टिकविणे ही एक 'साधना' आहे.

(पृष्ठ क्र. २ वरून - **संपादकीय**)

मासिकातून प्रकाशित केले आहेत. याखेरीज अनेक पुस्तकांचे संपादन त्यांनी केले आहे. आज वयाची १०० वर्षे पूर्ण केल्यानंतर देखील ते पेन्सिल्वेनिया विद्यापीठाचे मानद प्राध्यापक (Professor Emeritus) आणि बफेलो विद्यापीठाचे संशोधन प्राध्यापक (Research Professor) म्हणून कार्यरत आहेत. निवृत्त झाल्यानंतर आराम करणाऱ्या प्राध्यापक मंडळींनी त्यांच्या जीवनकार्यातून धडा घेण्याची गरज आहे असे मला वाटते.

प्राध्यापक राव यांना त्यांच्या भरीव कार्यासाठी अनेक पुरस्कार देण्यात आले आहेत. त्याची सुरुवात कलकत्ता विद्यापीठाने १९४३ मध्ये दिलेल्या सुवर्ण पदकाने झाली. मधल्या काळात वेगवेगळ्या संस्थानी त्यांना पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. त्याची यादी फारच मोठी आहे. जगातील ३८ विद्यापीठांनी त्यांना मानद डॉक्टरेट दिली आहे. २००१ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मविभूषण हा सन्मान प्रदान केला. २००२ मध्ये त्यावेळचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू बुश यांच्या हस्ते नॅशनल मेडल ऑफ ऑनर (National Medal of Honor) हा किताब देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. अलीकडे जाहीर झालेला संख्याशास्त्रातला आंतरराष्ट्रीय पुरस्कार म्हणजे राव सरांनी केलेल्या कार्याचा यथोचित गौरव आहे असेच म्हणावे लागेल. येत्या जुलै महिन्यात त्यांना हे पारितोषिक देण्यात येणार आहे. शंभरी पार केलेला हा भारतीय माणूस ८०,००० अमेरिकन डॉलर एवढी मोठी रक्कम एका मोठ्या समारंभात स्वीकारणार आहे. जगातील प्रसिद्ध संस्थांनी एकत्र येऊन २०१७ पासून संख्याशास्त्रातील आंतरराष्ट्रीय पारितोषिकाची (International Prize in Statistics) सुरुवात केली आहे. हे पारितोषिक दोन वर्षांतून एकदा देण्यात येते. पारितोषिक विजेत्या संख्याशास्त्रज्ञाची निवड करण्यासाठी नावाजलेल्या गणितज्ज्ञांची एक समिती तयार करण्यात आली आहे. या समितीच्या शिफारशीनुसार २०१७ चे पारितोषिक डेव्हिड कॉक (David cock) या ब्रिटिश गणितज्ज्ञाला, २०१९ चे ब्रॅडले एफ्रॉन (Bradley Efron) या अमेरिकन गणितज्ज्ञाला तर २०२१ चे पारितोषिक नॅन लेर्ड (Nan Laird) या अमेरिकन गणितज्ज्ञाला देण्यात आले होते. २०२३ च्या पारितोषिकासाठी एका भारतीय गणितज्ज्ञांची निवड करण्यात आली याचा प्रत्येक भारतीय व्यक्तीला अभिमान आहे. विशेष हे की, राव यांना हे पारितोषिक त्यांनी ७५ वर्षांपूर्वी केलेल्या कामासाठी देण्यात येत आहे. यावरून त्यांचे काम किती मूलभूत होते याची कल्पना येईल. भारतातील तरुण पिढीने राव सरांचा आदर्श ठेवून संशोधन क्षेत्रात स्वतःला झोकून द्यावे असे मी आवाहन करतो. संख्याशास्त्रात अध्यापन आणि संशोधन करणे सोयीचे व्हावे यासाठी राव सरांनी प्रयत्न करून एक संस्था उभी केली आहे. तिचे नाव सी. आर. राव ॲडवान्सड् इन्स्टिट्यूट ऑफ मॅथेमॅटिक्स, स्टॅटिस्टिक्स ॲंड कॉम्प्यूटर सायन्स (C. R. Rao Institute of Mathematics, Statistics and Computer Science) असे असून ती हैदराबाद शहरात आहे. याखेरीज पेन्सिल्वेनिया स्टेट युनिव्हर्सिटीने त्यांच्या नावाने संख्याशास्त्रात काम करणाऱ्या संशोधकांसाठी एक पारितोषिक निर्माण केले आहे. गणितात रुची असणाऱ्या तरुण मंडळींनी यांचा अवश्य लाभ घ्यावा असे मी या निमित्ताने सुचवू इच्छितो.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❈ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❈ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❈ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❈ संपर्क ❈

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.